सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८

# मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७

(दिनांक ३० जून, २००६ पर्यंत सुधारित)

Bombay Act No. XXVIII of 1947

# The Bombay Agricultural Debtors Relief Act, 1947

*(As modified upto 30th June, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांनी मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी प्रकाशित केले.

2006

[किंमत : रु. ८-००]

# मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७

## अनुक्रमणिका

### प्रकरण १

### प्रारंभिक


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व व्याप्ती .. .. .. | १ |
| २. | व्याख्या .. .. .. | १ |
| ३. | बचाव .. .. .. | ४ |


### प्रकरण २

### कर्जांच्या तडजोडीबाबत कार्यरीती


| | | |
|---|---|---|
| ४. | कर्जांची तडजोड करण्यासाठी अर्ज .. .. .. | ५ |
| ५. | प्रत्येक धनकोने व कर्जदाराने न्यायालयापुढे खरे व बिनचूक विवरणपत्रक दाखल करणे. | ५ |
| ६. | संयुक्तपणे व पृथक्पणे जबाबदार असलेल्या कर्जदाराने केलेला अर्ज विवरणपत्रक दाखल करणे .. .. .. | ६ |
| ७. | कर्जदार नसलेल्या व्यक्तींच्या अभिहास्तांकितीस ह्या अधिनियमाचा फायदा मिळण्याचा हक्क नसणे .. .. .. | ६ |
| ८. | तडजोडीची नोंद करण्याबाबत अर्ज .. .. .. | ६ |
| ९. | न्यायालयापुढे काम चालू असता केलेली तडजोड .. .. .. | ७ |
| १०. | काही तडजोडी निरर्थक असणे .. .. .. | ७ |
| ११. | ज्या कर्जदाराची कर्जे १५,००० रुपयांहून अधिक नाहीत अशा कर्जदाराच्या बाबतीत फक्त कलम ४ किंवा ८ अन्वये अर्ज करता येईल .. .. .. | ७ |
| १२. | अर्ज मागे घेणे .. .. .. | ७ |
| १३. | अर्ज एकत्रित करणे .. .. .. | ७ |
| १३क. | काही अर्ज संयुक्त दिवाणी न्यायाधिशाकडे निर्णयासाठी पाठविण्याचा दिवाणी न्यायाधिशांचा अधिकार .. .. .. | ७ |
| १४. | कर्जाचे विवरणपत्रक सादर करण्याबद्दल कर्जदार व धनको यांवर नोटीस बजावणे .. | ८ |
| १५. | ज्या कर्जांच्या संबंधात तडजोडीसाठी किंवा तडजोडीसाठी अर्ज करण्यात आला नाही ती कर्जे निरर्थक असणे .. .. .. | ८ |
| १६. | कर्जदार व धनको यांची कर्तव्ये .. .. .. | ८ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १७. | प्राथमिक वादविषय .. .. .. | ८ |
| १८. | [रद्द केले] .. .. .. | ८ |
| १९. | अनिर्णित दावे, अपिले, अर्ज व कामे न्यायालयाकडे पाठविणे .. .. | ९ |
| २०. | हिशोब घेणे .. .. .. | १० |
| २१. | धनकोची व कर्जदाराची तपासणी .. .. .. | १० |
| २२. | हिशोब घेण्याची रीत .. .. .. | १० |
| २३. | काही बाबतीत उत्पन्नाऐवजी खंड आकारता येईल .. .. .. | १२ |
| २४. | विक्रीच्या अर्थाचे हस्तांतरण हे गहाणाच्या स्वरूपाचा व्यवहार आहे असा निर्णय देण्याचा न्यायालयाचा अधिकार .. .. .. | १३ |
| २५. | कलम २४ च्या तरतुदी काही हस्तांतरणास व हस्तांतरितीस लागू नसणे .. .. | १३ |
| २६. | जिल्हाधिकारी, सहकारी संस्था, सहकारी अधिकारी, स्थानिक प्राधिकारी यांस व इतरांस नोटीस .. .. .. | १३ |
| २७. | मालमत्तेचा तपशील, किंमत वगैरे निश्चित करणे हे न्यायालयाचे कर्तव्य .. .. | १४ |
| २८. | लबाडीने मालमत्ता दुसऱ्याच्या नावे करून देणे किंवा त्यावर भार निर्माण करणे निरर्थक होईल. .. .. .. | १४ |
| २९. | कर्जदाराच्या मालमत्तेची किंमत विहित केलेल्या रीतीने न्यायालयाने ठरविणे .. | १५ |
| ३०. | कर्ज फेडण्याचे सामर्थ्य .. .. .. | १५ |
| ३१. | कर्जदराने द्यावयाची कर्जे क्रमाने कमी करणे .. .. .. | १५ |
| ३२. | निवाडा .. .. .. | १६ |
| ३३. | प्रांतिक जमीन गहाण घेणाऱ्या बँकेमार्फत कर्जांची तडजोड करण्यासाठी न्यायालयाने योजना तयार करणे .. .. .. | १७ |
| ३४. | क्रमाने कमी केलेल्या कर्जांपेक्षा अधिक रक्कम वसूल करता येणार नाही .. .. | १८ |
| ३५. | संगनमत झाल्याच्या बाबतीत कर्जे क्रमाने कमी न करणे .. .. | १९ |
| ३६. | कोणताही पक्षकार हजर राहिला नाही तर एकपक्षीय काम चालविणे .. | १९ |
| ३७. | निवाड्याचा प्रश्न पुन्हा उपस्थित करणे व कर्जांची पुन्हा तडजोड करणे .. | १९ |
| ३८. | निवाड्याची नोंदणी करणे: त्याची बजावणी कशी करावी .. .. | १९ |
| ३९. | सूट वगैरे यांच्या बाबतीत हप्त्याचा भरणा पुढे ढकलणे | २० |

कलमे पृष्ठे

४०. कर्जदाराने कर्ज फेडीपूर्वी मालमत्ता दुसऱ्याच्या नावे करून देणे हे वैध असणार नाही .. २०

४१. कर्जदाराच्या कर्जफेडीसाठी त्याच्या मालमत्तेची विक्री करण्याविषयी आदेश देण्याचा न्यायालयाचा अधिकार ... .. .. २१

४२. वकील वगैरे यांस हजर राहण्यास प्रतिबंध .. .. .. २१

४३. अपिले .. .. .. २१

४३अ. अपिलांची सुनावणी करण्याचा अधिकार असलेल्या साहव्यक न्यायाधिशाकडे किंवा दिवाणी न्यायाधिशाकडे काही अपिले निर्णयासाठी पाठविण्याचा जिल्हा न्यायाधिशाचा अधिकार .. .. .. २२

४४. न्यायालय शुल्क .. .. .. २२

४५. नोटीशीची बजावणी कशी करावी .. .. .. २३

४६. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुदी चालविलेल्या कामांस लागू असणे .. .. २३

**प्रकरण २-क**

**निवाड्यांची नोंदणी**

४६अ. कर्ज तडजोड नोंदवही व सूचिपत्र .. .. .. २३

४६ब. न्यायालयाने निवाडे व ज्ञापने निबंधक व उप-निबंधक यांच्याकडे पाठविणे .. २३

४६क. निबंधकांना अपिलांची नोटीस देणे .. .. .. २३

४६ड. नोंदणी .. .. .. २३

४६ई. रद्द केलेल्या अधिनियमाअन्वये केलेल्या निवाड्यांची नोंदणी .. .. २४

४६फ. निवाड्याची नोटीस .. .. .. २४

४६ग. भारतीय नोंदणी अधिनियम लागू असणे .. .. .. २४

**प्रकरण ३**

**नादारीबाबत चालविलेली कामे**

४७. न्यायालयाने विवक्षित परिस्थितीत कर्जदारास नादार ठरविणे .. .. २४

४८. नादारीसंबंधी चालविलेल्या कामांत अनुसरावयाची कार्यरीती .. .. २५

४९. नादार व्यक्तीच्या संपत्तीची वाटणी .. .. .. २५

५०. इतर न्यायालयांत नादारीबाबत अर्ज करण्यास प्रतिबंध .. .. .. २५

५१ अपिलांस प्रतिबंध .. .. .. २५

## प्रकरण ४

## संकीर्ण

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ५१क. | दिवाणी दावे किंवा कारवाई यांस प्रतिबंध .. .. .. | २५ |
| ५२. | ज्या मुदतीत ह्या अधिनियमाअन्वये न्यायालयापुढे काम चालू असेल ती मुदत वगळणे | २५ |
| ५३. | कर्जाची फेड करण्यापूर्वी उभी पिके, वगैरे दुसऱ्याच्या नावे करून देण्यास मनाई .. | २५ |
| ५४. | कर्जदारास कर्ज देण्याविषयी कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत करण्याचा राज्य सरकारचा अधिकार .. .. .. | २६ |
| ५५. | नियम .. .. .. | २६ |
| ५६. | सन १८७९ चा अधिनियम १७ व सन १९३९ चा मुंबई अधिनियम २८ हे रद्द करणे .. | २७ |
| ५७. | विलीन प्रदेशांतील धनकोस देणे असलेल्या कर्जाच्या संबंधात कलम ४ अन्वये अर्ज करण्याबाबत विशेष तरतूद ... .. .. | २८ |
| ५८. | विलीन प्रदेशांत असलेल्या जमिनीच्या बाबतीत कलम २४ अन्वये अर्ज करण्याबाबत विशेष तरतूद .. .. .. | २८ |

------------

# सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८[१]

## [मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७]

[२७ मे, १९४७]

ह्या अधिनियमात, पुढील आदेश व अधिनियम यांअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

सन १९४८ चा मुंबई अधिनियम ७०.
विधि अनुकूलन आदेश, १९५०.
सन १९५० चा मुंबई अधिनियम ३७.
सन १९५१ चा मुंबई अधिनियम ४१.
सन १९५२ चा मुंबई अधिनियम १९.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम १८.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम २२.
सन १९५५ चा मुंबई अधिनियम ३७.

### मुंबई प्रांतांतील कर्जदार शेतकऱ्यांना सहाय्य देण्यासंबंधी विधि एकत्रित करुन सुधारण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** मुंबई प्रांतांतील कर्जदार शेतकऱ्यांना सहाय्य देण्यासंबंधी विधि एकत्रित करून सुधारणे आणि ह्यात निर्दिष्ट केलेल्या इतर काही गोष्टींची तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :--

### प्रकरण १

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व व्याप्ती.

**१.** (१) ह्या अधिनियमास, मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७ असे म्हणावे.

(२) तो मुंबई शहर खेरीज करून सबंध मुंबई [२][राज्यास] लागू आहे.

व्याख्या.

**२.** विषयात किंवा संदर्भात एतद्विरुध्द काही नसल्यास, ह्या अधिनियमात :--

(१) "निवाडा" या संज्ञेचा अर्थ, कलम ८, पोट-कलम (४) किंवा कलम ९, ३२ किंवा ३३ अन्वये केलेला निवाडा अगर जो अपिलांत न्यायालयाने कायम केला असेल किंवा ज्यात फेरफार केला असेल असा निवाडा असा समजावा ;

१९२५ चा मुंबई ७.

(२) "सहकारी संस्था" या संज्ञेचा अर्थ, मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५ याच्या तरतुदीं अन्वये नोंदलेली संस्था असा समजावा ;

(३) "न्यायालय" या संज्ञेचा अर्थ, कर्जदार सामान्यतः ज्या क्षेत्रात राहतो त्या क्षेत्रात सामान्य क्षेत्राधिकार ज्यास आहे असे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) याचे न्यायालय आणि असा दिवाणी न्यायाधीश नसेल तर, असा क्षेत्राधिकार ज्यास आहे असे दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) याचे न्यायालय, असा समजावा ; [३][आणि त्यात ज्या कोणत्याही न्यायालयाकडे कलम १३-क अन्वये अर्ज निकालात काढण्यासाठी (पाठविता) येतो अशा न्यायालयाचा समावेश होतो] ;

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, **मुंबई शासन राजपत्र,** १९४७, भाग पाच, पृष्ठ क्र. ६५ पहा ; विधानसभेतील कामकाजासंबंधी मुंबई विधानसभा चर्चा, १९४७, खंड दहा पहा ; आणि विधान परिषदेतील कामकाजासंबंधी मुंबई विधान परिषद चर्चा, १९४७, खंड बारा पहा.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतास" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल केला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम २(१) द्वारे हा मजकूर जादा दाखल केला.

(४) "कर्ज" या संज्ञेचा अर्थ, कर्जदाराने पैशाच्या किंवा मालाच्या स्वरूपात द्यावयाचे कोणतेही देणे--मग त्याबद्दल तारण घेतलेले असो किंवा नसो, अगर ते कोणत्याही दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्याअन्वये किंवा आदेशाअन्वये अन्यथा द्यावयाचे असो-- असा समजावा, [१][आणि त्यात ज्याच्या फेडीबद्दल स्थावर मालमत्तेच्या फलोपभोग गहाणाच्या रूपाने तारण देण्यात आले आहे अशा, गहाणावर दिलेल्या पैशाचा समावेश होतो,] परंतु त्यात शेतकीच्या कामाबद्दल किंवा अंगमहनतीबद्दल देणे असलेल्या मजुरीच्या थकबाकीचा समावेश होत नाही ;

(५) "कर्जदार" या संज्ञेचा अर्थ, पुढीलप्रमाणे समजावा :--

(क) (१) ज्यास कर्ज आहे,

(२) ज्या जमिनीचे हस्तांतरण करण्यात आले आहे--मग ते लेखान्वये केलेले असो किंवा नसो-- व जिच्या अशा हस्तांतरणाचा आशय गहाणाचा नसला तरी वास्तविक ते गहाणाच्याच स्वरूपाचे आहे अशी शेतकीच्या कारणासाठी वापरण्यात येत असलेली जमीन जो धारण करीत आहे किंवा दिनांक ३० माहे जानेवारी सन १९४० पूर्वी ३० वर्षांहून अधिक नाही अशा मुदतीत कोणत्याही वेळी ज्याने धारण केली होती,

(३) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकीच्या निकटपूर्वी किंवा रद्द केलेल्या अधिनियमा अन्वये संबंधित मंडळ स्थापन झाल्याच्या दिनांकीच्या निकटपूर्वी दोन वर्षातील लागवडीच्या हंगामात ज्याने जातीने जमीन कसली असेल, आणि

(४) शेतकीकाम व अंगमेहनत यांखेरीज इतर साधनांपासून ज्याचे वार्षिक उत्पन्न त्याच्या एकूण वार्षिक उत्पन्नाच्या शेकडा ३३ टक्के किंवा ५०० रुपये या दोहोंपैकी जी रक्कम मोठी असेल त्या रकमेपेक्षा अधिक नाही.

अशा व्यक्ती ;

(ख) (१) ज्या कुटुंबास कर्ज आहे,

(२) ज्या जमिनीचे हस्तांतरण करण्यात आलेले आहे--मग ते लेखाअन्वये केलेले असो किंवा नसो--व जिच्या अशा हस्तांतरणाचा आशय गहाणाचा नसला तरी वास्तविक ते गहाणाच्याच स्वरूपाचे आहे अशी शेतकीच्या कारणासाठी वापरण्यात येत असलेली जमीन जे कुटुंब धारण करीत आहे किंवा दिनांक ३० माहे जानेवारी सन १९४० पूर्वी तीस वर्षांहून अधिक नाही अशा मुदतीत कोणत्याही वेळी ज्या कुटुंबाने धारण केली होती,

(३) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वी किंवा रद्द केलेल्या अधिनियमा अन्वये संबंधित मंडळ स्थापन झाल्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वी दोन वर्षातील लागवडीच्या हंगामात ज्या कुटुंबाने जातीने जमीन कसली असेल, आणि

(४) शेतकीकाम व अंगमेहनत यांखेरीज इतर साधनांपासून ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न त्याच्या एकूण वार्षिक उत्पन्नाच्या शेकडा ४० टक्क्यांहून अधिक नाही व ज्या कुटुंबातील व्यक्तींच्या अशा उत्पन्नांची एकूण रक्कम १,५०० रुपयांहून अधिक नाही.

असे अविभक्त हिंदू कुटुंब.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम २(२) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

**स्पष्टीकरण** [1][१]--ह्या खंडाच्या प्रयोजनांकरिता "शेतकी" या संज्ञेत बागायत करणे, पिके काढणे किंवा बागायतीचे उत्पन्न काढणे, दुभदुभत्याचा धंदा करणे, कोंबड्या पाळण्याचा धंदा करणे, गुरांची पैदास करणे व गुरे चारणे यांचा समावेश होतो. परंतु त्यात जमीन खंडाने देणे किंवा फक्त लाकडे तोडणे यांचा समावेश होत नाही ;

[2][**स्पष्टीकरण २**--

(अ) मृत्यूनंतर ज्याचे पश्चात त्याची विधवा स्त्री किंवा अवयस्क किंवा शारीरिक अगर मानसिक दौर्बल्य जडलेला मनुष्य वारस असेल अशी कोणताही व्यक्ती, अथवा

(ख) ज्या कुटुंबात जमीन जातीने कसण्यास समर्थ असलेला कोणी प्रौढ पुरुष सह-भागीदार नाही असे अविभक्त हिंदू कुटुंब,

यांच्या बाबतीत, अशा वारसास किंवा कुटुंबास जमीन शेतकीच्या कारणासाठी पट्ट्याने दिल्यामुळे मिळणारे उत्पन्न हे, स्पष्टीकरण १ मध्ये काहीही असले तरी, शेतीपासून मिळणारे उत्पन्न आहे असे समजले पाहिजे ;]

[3][(६) "पिकांसाठी पैसा पुरविणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, नांगरणीच्या हंगामात पिके काढणे किंवा त्यानंतर नांगरणी, पेरणी, कुळवणी, बेगणी, कापणी, बियाणे व खत यांची खरेदी यांसाठी किंवा विहित करण्यात येतील अशा इतर कारणांसाठी कर्जे देणे असा समजावा--असे कर्ज ज्या पिकासाठी देण्यात आले त्या पिकाच्या कापणीच्या हंगामात त्याची फेड करावयाची असते ;]

१८७९ चा मुंबई ५.

(७) "धारण करणारा" या संज्ञेचा अर्थ, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९, कलम ३, खंड (११) यात "धारण करणारा", या व्याख्येत येणारी व्यक्ती असा समजावा आणि त्यात सरकारास किंवा गावच्या लोकास उपयुक्त असलेले जे काम प्रत्यक्षपणे करण्यात येत आहे अशा कामाबद्दल ज्याने जमीन धारण केली आहे अशा व्यक्तीचा समावेश होतो ; परंतु त्यात धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेच्या वतीने ज्याने कोणतीही जमीन धारण केली आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होत नाही ; आणि "जमीन धारण करणे" या शब्द प्रयोगाचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात आला पाहिजे.

[4][(७-क) "विलीन संस्थानाची बँक" या संज्ञेचा अर्थ, विलीन प्रदेशात बँक म्हणून संस्थापित केलेली आणि राज्य सरकारने राजपत्रात ह्या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता "विलीन संस्थानाची बँक" म्हणून जाहीर केलेली बँक असा समजावा.]

(८) "विहित" म्हणजे नियमांनी विहित केलेले ;

१८७९ चा मुंबई २८.

(९) "रद्द केलेला अधिनियम" म्हणजे मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९३९ ;

१९२५ चा मुंबई ७.

(१०) "साधनसंस्था" या संज्ञेचा अर्थ, मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५ यास जो दिला आहे तोच असेल ;

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम २(३) द्वारे या स्पष्टीकरणास त्याचे स्पष्टीकरण १ असा क्रमांक दिला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २(३) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल केले.

[3] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम २(४) द्वारे मूळ खंड (६) ऐवजी हा खंड दाखल केला.

[4] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २ द्वारे खंड (७-क) समाविष्ट केला.

(११) "नियम" म्हणजे कलम ५५ अन्वये केलेले नियम ;

(१२) "अनुसूचित बँक" म्हणजे भारताच्या रिझर्व्ह बँकेबाबत अधिनियम, १९३४ याच्या दुसऱ्या अनुसूचित समाविष्ट केलेली बँक ; १९३४ चा २.

(१३) "हंगामी पैसा पुरविणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, विहित करण्यात येतील अशा कारणांकरिता कर्ज देणे असा समजावा. अशा कर्जाची फेड पुढील मे महिन्याच्या पंधराव्या दिनांकास किंवा तत्पूर्वी करावयाची असते.

(१४) "जातीने (जमीन) कसणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, स्वत:च्या अंगमेहनतीने किंवा स्वत:च्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या अंगमेहनतीने किंवा स्वत:च्या देखरेखीखाली किंवा स्वत:च्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली, नोकरांकरवी किंवा मजुरीने कामावर लावलेल्या मजुरांकरवी (जमीन) कसणे असा समजावा.

**स्पष्टीकरण १**--जातीने जमीन कसणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्यांच्या पश्चात् त्याची विधवा स्त्री अथवा अवयस्क किंवा शारीरिक अगर मानसिक दौर्बल्य जडलेला व्यक्ती वारस असेल तर, अशी जमीन अशा वारसातर्फे नोकरांकरवी किंवा मजुरीने कामावर लावलेल्या मजुरांकरवी किंवा कुळांकरवी कसली जात असली तरी, असा वारस अशी जमीन जातीने कसतो असे समजले पाहिजे.

**स्पष्टीकरण २**--अविभक्त हिंदू कुटुंबाच्या बाबतीत, जर जमीन अशा कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीकडून कसण्यात येईल तर, अशी जमीन जातीने कसण्यात येते असे समजले पाहिजे. जर अशा कुटुंबात जातीने जमीन कसण्यास समर्थ असलेले असे प्रौढ पुरुष सह-भागीदार नसतील तर, ती जमीन अशा कुटुंबातर्फे नोकराकरवी किंवा मजुरीने कामावर लावलेल्या मजुरांकरवी किंवा कुळांकरवी कसली जात असल्यास असे कुटुंब अशी जमीन जातीने कसते असे समजले पाहिजे.

(१५) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ, यथास्थिति, व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ किंवा मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ यात त्या शब्दांचा व शब्दप्रयोगांचा जो अर्थ दिलेला असेल तोच असेल. १९०८ चा ५.

बचाव. **३.** अन्यथा स्पष्टपणे जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींमुळे पुढील सदरांत येणाऱ्या कर्जदाराच्या कर्जास व जबाबदाऱ्यास बाध येणार नाही ; म्हणजे :-- १८७९ चा मुंबई ५.

(१) सरकारला द्यावयाचा कोणताही महसूल किंवा कर अगर कर्ज म्हणून किंवा अन्यथा त्यास देणे असलेली कोणतीही इतर रक्कम,

(२) स्थानिक प्राधिकाऱ्याला द्यावयाचा कोणताही कर अगर कर्ज म्हणून किंवा, अन्यथा अशा प्राधिकाऱ्यास द्यावयाची कोणतीही इतर रक्कम,

(३) सहकारी संस्थेस देणे असलेली कोणतीही रक्कम,

(४) रद्द केलेल्या अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे पिकांसाठी पैसा पुरविण्याच्या कारणाकरिता किंवा या अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे हंगामी पैसा पुरविण्याच्या कारणांकरिताच केवळ दिलेली कोणतीही रक्कम,

(५) सक्षम न्यायालयाने पोटगीबाबत केलेला हुकूमनामा किंवा दिलेला आदेश यांअन्वये देणे असलेली कोणतीही रक्कम [१][**]

(६) अनुसूचित बँकेस देणे असलेली कोणतीही रक्कम [२][आणि

(७) विलीन संस्थानांच्या बँकेस देणे असलेली कोणतीही रक्कम.]

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३ द्वारे "आणि" हा शब्द वगळला.

[२] वरील अधिनियमाद्वारे खंड (७) जादा दाखल केला.

## प्रकरण २.

### कर्जांच्या तडजोडीबाबत कार्यरीती

**कर्जांची तडजोड करण्यासाठी अर्ज.**

**४.** (१) रद्द केलेल्या अधिनियमांचे कलम ४ याअन्वये ज्या स्थानिक क्षेत्रासाठी मंडळ स्थापन करण्यात आले होते अशा कोणत्याही स्थानिक क्षेत्रात दिनांक १ माहे फेब्रुवारी सन १९४७ या रोजी किंवा तद्नंतर सामान्यतः वास्तव्य करणाऱ्या कोणत्याही कर्जदारास किंवा त्याच्या धनकोस न्यायालयाकडे त्याच्या कर्जांची तडजोड करण्यासाठी दिनांक १ माहे ऑगस्ट सन १९४७ पूर्वी अर्ज करण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये करावयाचा प्रत्येक अर्ज विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे लेखी असला पाहिजे आणि त्यावर विहित केलेल्या रीतीने सही केली पाहिजे व त्याच्या खरेपणाबद्दल प्रामाण्यलेख करून दिला पाहिजे व त्याच रीतींने तो सादर केला पाहिजे.

(३) कलम ३ मध्ये काहीही असले तरी, या कलमान्वये केलेल्या अर्जात कर्जदाराने देणे असलेल्या व वरील कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या सर्व कर्जांच्या रकमा व तपशील असला पाहिजे.

**प्रत्येक धनकोने व कर्जदाराने न्यायालयापुढे खरे व बिनचूक विवरणपत्रक दाखल करणे.**

**५.** (१) कलम ४ अन्वये कोणताही अर्ज दाखल करण्यात आलेला नसला तरी--

(अ) प्रत्येक धनकोने, त्याच्या कर्जदारापैकी कोणत्याही कर्जदाराने लेखी नोटीस देऊन तसे करण्यास सांगितल्यावर, अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, अशा कर्जदाराविरुध्द असलेल्या सर्व दाव्यांचे खरे व बिनचूक विवरणपत्रक न्यायालयापुढे दाखल केले पाहिजे आणि त्याचवेळी त्याची एक प्रत अशा कर्जदाराकडे पाठविली पाहिजे, आणि

(ख) प्रत्येक कर्जदाराने, त्याच्या धनकोपैकी, कोणत्याही धनकोने लेखी नोटीस देऊन तसे करण्यास सांगितल्यावर, अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत पुढील गोष्टींबाबत खरे व बिनचूक विवरणपत्रक न्यायालापुढे दाखल केले पाहिजे ; म्हणजे --

(१) अशा कर्जदाराने देणे असलेल्या सर्व कर्जाबाबत ;

(२) शेतकीच्या कारणांसाठी वापरण्यात येत असलेली कोणतीही जमीन तो धारण करतो किंवा कसे आणि तो जमीन जातीने कसतो किंवा कसे याबाबत ;

(३) नोटीशीच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या वर्षात शेतीपासून व शेतीव्यतिरिक्त इतर साधनांपासून त्यास मिळालेले उत्पन्न याबाबत ;

कर्जदाराने त्याचवेळी अशा विवरणपत्रकाची एक प्रत अशा धनकोकडे पाठविली पाहिजे :

परंतु, यथास्थिती धनकोने किंवा कर्जदाराने ज्या मुदतीत असे विवरणपत्रक दाखल केले पाहिजे ती मुदत पुरेशा कारणावरून वेळोवेळी वाढविण्याचा न्यायालयास अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये ज्याने नोटीस दिली असेल अशा प्रत्येक कर्जदाराने किंवा धनकोने त्याचवेळी तिची एक प्रत न्यायालयाकडे पाठविली पाहिजे.

(३) कलम ४ अन्वये केलेल्या कोणत्याही अर्जासंबंधी चालविलेल्या कोणत्याही कामाचा खर्च देताना न्यायालयाची अशी खात्री झाली की, पोट-कलम (१) अन्वये दाखल करावयाचे विवरणपत्रक पुरेसे कारण नसता, त्यात निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत किंवा पोट-कलम (१) च्या परंतुकाअन्वये वाढविलेल्या मुदतीच्या आत दाखल करण्यात आले नाही किंवा चुकीचे विवरणपत्रक दाखल करण्यात आले आहे तर, अशा न्यायालयास, ज्या पक्षकाराची कसूर असेल त्याने अशा कामाचा सर्व खर्च किंवा त्याचा कोणताही भाग सोसला पाहिजे, असा निदेश देण्याचा अधिकार आहे.

संयुक्तपणे व पृथक्‌पणे जबाबदार असलेल्या कर्जदाराने केलेला अर्ज.

**६.** (१) कर्जदाराने द्यावयाच्या कर्जाच्या फेडीबद्दल जामीन देऊन हमी दिलेली असेल तर किंवा कर्जदार कोणत्याही कर्जाबद्दल कोणत्याही इतर व्यक्तीबरोबर अन्यथा संयुक्तपणे व पृथक्‌पणे जबाबदार असेल तर आणि असा जामीन किंवा अशी इतर व्यक्ती कर्जदार नसेल तर, कर्जदारास अशा कर्जाच्या बाबतीत सहाय्य मिळविण्यासाठी कलम ४ अन्वये अर्ज करण्याचा अधिकार आहे. आणि न्यायालयात अशा प्रकरणांतील सर्व गोष्टींचा व परिस्थितीचा विचार करून अशा अर्जदाराचा संबंध असेल तेथवर, ह्या अधिनियमान्वये कर्जाच्या तडजोडीचे काम चालविण्याचा अधिकार आहे.

(२) कर्जदाराने देणे असलेल्या ज्या कर्जाबद्दल जामीन देऊन हमी देण्यात आली असेल अशा कर्जाची पोट-कलम (१) अन्वये ज्या ज्या वेळी तडजोड करण्यात आली असेल त्या त्या वेळी, अशा कर्जदाराची जी कर्जे किंवा कर्जाचा भाग कलम १५, पोट-कलम (१) कलम १७, पोट-कलम (३), कलम २६, पोट-कलम (५), कलम ३४ किंवा कलम ३५, पोट-कलम (२) याअन्वये लुप्त झाला असेल अशा कर्जाच्या किंवा कर्जाच्या भागाच्या बाबतीत असा जामीन मुक्त झाला आहे असे समजले पाहिजे ; आणि अशा कर्जाच्या किंवा त्याच्या भागाच्या बाबतीत कर्जदाराविरूध्द कोणतीही कारवाई करण्याचा जामिनास हक्क असणार नाही.

कर्जदार नसलेल्या व्यक्तींच्या अभिहस्तांकितीस ह्या अधिनियमाचा फायदा मिळण्याचा हक्क नसणे.

**७.** जो स्वत: कर्जदार नाही अशा कोणत्याही व्यक्तीने दिनांक १ माहे जानेवारी सन १९३८ नंतर ज्या कोणत्याही कर्जदाराकडे एखादे कर्ज हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित (असैन्ड) केले असेल अशा कर्जदाराने देणे असलेल्या कोणत्याही कर्जाची तडजोड करण्यासाठी कलम ४ अन्वये कोणताही अर्ज करता येणार नाही.

तडजोडीची नोंद करण्याबाबत अर्ज.

**८.** (१) जर कोणताही कर्जदार आणि त्याच्या धनकोपैकी कोणताही धनको किंवा सर्व धनको यांच्या दरम्यान अशा कर्जदाराने अशा धनकोस द्यावयाच्या कोणत्याही कर्जाच्या संबंधाने तडजोड झाली असेल तर, अशा कर्जदारास किंवा अशा धनकोपैकी कोणत्याही धनकोस, अशी तडजोड घडून आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, अशा तडजोडीची नोंद करण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे.

(२) असा अर्ज विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे असला पाहिजे आणि विहित केलेल्या रीतीने त्यावर सही केली पाहिजे व त्याच्या खरेपणाबद्दल त्याच रीतीने प्रामाण्यलेख करून दिला पाहिजे.

(३) न्यायालयास असा अर्ज मिळाल्यावर आणि, यथास्थिती, धनकोस किंवा कर्जदारास त्याने नोटीस दिल्यावर आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यावर त्याची अशी खात्री झाली की, घडून आलेली तडजोड खरोखरीची व स्वखुषीने केली आहे आणि कर्जदाराच्या धनकोपैकी कोणत्याही धनकोचे देणे बुडविण्याच्या किंवा ते फेडण्यास विलंब लावण्याच्या हेतूने करण्यात आली नाही व ती कर्जदाराच्या हिताची आहे तर, [१][ * * *] न्यायालयाने अशा तडजोडीची नोंद केली पाहिजे व त्याबद्दल प्रमाणपत्र दिले पाहिजे. अशा रितीने जिची नोंद करण्यात आली आहे व जिच्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले आहे अशी प्रत्येक तडजोड तिच्या उभय पक्षास बंधनकारक असेल, आणि यात यापुढे अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीज करून तिच्यासंबंधी कोणताही प्रश्न पुन्हा उपस्थित करता येणार नाही.

(४) न्यायालयाने, पोट-कलम (३) अन्वये तडजोडीची नोंद करून त्याबद्दल प्रमाणपत्र दिल्यावर, तडजोडीत समाविष्ट न केलेली अशी कर्जदाराने द्यावयाची कोणतीही इतर कर्जे आहेत किंवा कसे याविषयी निवेदन करण्यास

---

[१] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर वगळला.

कर्जदारास सांगितले पाहिजे. जर कर्जदाराने अशी कोणतीही कर्जे नाहीत असे निवेदन केले तर, न्यायालयाने अशा तडजोडीबरहूकूम निवाडा केला पाहिजे.

(५) अशा तडजोडीची नोंद केल्यावर न्यायालयाची अशी खात्री झाली की, तडजोडीत समाविष्ट न केलेली अशी इतर कर्जे कर्जदाराने द्यावयाची आहेत तर, न्यायालयाने, पोट-कलम (१) अन्वये केलेला अर्ज हा कलम ४ अन्वये कर्जाच्या तडजोडीसाठी केलेला अर्ज आहे असे मानले पाहिजे.

**९.** वरील कलमात काहीही असले तरी, यथास्थिती न्यायालयापुढे किंवा अपील न्यायालयापुढे काम चालू असता, कर्जदार व त्याचे सर्व धनको यांच्या दरम्यान तडजोड घडून आली असेल आणि न्यायालयाची अशी खात्री झाली असेल की, कर्जदाराने अशी तडजोड स्वखुषीने केलेली आहे व ती त्याच्या हिताची आहे, तर न्यायालयास अशा तडजोडीबरहुकूम निवाडा करण्याचा अधिकार आहे.

न्यायालयापुढे काम चालू असता केलेली तडजोड.

**१०.** कर्जदाराने कोणत्याही धनकोस द्यावयाच्या कर्जासंबंधाने झालेल्या ज्या तडजोडीबद्दल न्यायालयाने कलम ८ अन्वये प्रमाणपत्र दिले नसेल किंवा अशा तडजोडीबरहूकूम कलम ९ अन्वये निवाडा करण्यात आला नसेल अशी प्रत्येक तडजोड निरर्थक असेल आणि ती कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही कारणाकरता मान्य करिता कामा नये.

काही तडजोडी निरर्थक असणे.

**११.** अर्ज केल्याच्या दिनांकास कर्जदाराने देणे असलेल्या कर्जाची एकूण रक्कम १५,००० रुपयांपेक्षा अधिक असेल तर, कोणत्याही न्यायालयाने कलम ४ किंवा ८ अन्वये केलेला कोणताही अर्ज अशा कर्जदाराच्या संबंधाने किंवा वतीने स्वीकारता कामा नये.

ज्या कर्जदाराची कर्जे १५,००० रुपयांहून अधिक नाहीत अशा कर्जदाराच्या बाबतीतच फक्त कलम ४ किंवा ८ अन्वये अर्ज करता येईल.

**१२.** कलम ४ अन्वये कर्जाच्या तोडजोडीसाठी केलेला अर्ज किंवा कलम ८ अन्वये तडजोडीची नोंद करण्यासाठी केलेला अर्ज हा न्यायालयाच्या परवानगीवाचून मागे घेता येणार नाही.

अर्ज मागे घेणे.

**१३.** जेव्हा एकाच कर्जदाराकडून किंवा एकाच कर्जादाराविरूध्द कर्जाच्या तडजोडीसाठी कलम ४ अन्वये दोन किंवा अधिक अर्ज करण्यात आले असतील तेव्हा, असे सर्व अर्ज एकत्रित केले पाहिजेत. जेव्हा असे निरनिराळे अर्ज सामाईक [1][कर्जदारांकडून किंवा] सामाईक कर्जदारांविरूध्द सादर करण्यात आले असतील तेव्हा, अशा सर्व अर्जांची सुनावणी एकत्र केली पाहिजे.

अर्ज एकत्रित करणे.

[2][**१३-क.** दिवाणी न्यायाधिशास, कलम ४ किंवा ८ अन्वये दाखल केलेला कोणताही अर्ज निर्णयासाठी संयुक्त दिवाणी न्यायाधिशाकडे पाठविण्याचा अधिकार आहे.]

काही अर्ज संयुक्त दिवाणी न्यायाधिशाकडे निर्णयासाठी पाठविण्याचा दिवाणी न्यायाधिशाचा अधिकार.

---

१ सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे हे कलम समाविष्ट केले.

**कर्जाचे विवरणपत्रक सादर करण्याबद्दल कर्जदार व धनको यांवर नोटीस बजावणे.**

१४. कर्जाच्या तोडजोडीसाठी अर्ज आल्यावर न्यायालयाने,--

(क) ज्यांची नांवे व पत्ते अर्जात दिलेली आहेत अशा कर्जदारास (तो स्वतः अर्जदार नसल्यास) आणि प्रत्येक धनकोस (जो धनको स्वतः अर्जदार आहे त्या व्यतिरिक्त इतरांस) नोटीस दिली पाहिजे, आणि

(ख) एक सर्वसाधारण नोटीस प्रसिध्द केली पाहिजे,

व नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून किंवा सर्वसाधारण नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून, यांपैकी जी उशिराची असेल त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत विहित केलेल्या नमुन्या प्रमाणे एक विवरणपत्रक सादर करण्याविषयी कर्जदारास आणि सर्व धनकोस अशा नोटिशीद्वारे फर्माविले पाहिजे :

परंतु, जर न्यायालयाची अशी खात्री झाली की, कर्जदार किंवा कोणताही धनको हा, सबळ व पुरेशा कारणावरून नोटिशीत निर्दिष्ट केलेल्या मुदतीत त्यात फर्माविल्याप्रमाणे विवरण पत्रक सादर करण्यास असमर्थ आहे तर न्यायालयास विवरणपत्रक सादर करण्याची मुदत वाढविण्याचा अधिकार आहे.

**ज्या कर्जाच्या संबंधात तोडजोडीसाठी किंवा तडजोडीसाठी अर्ज करण्यात आला नाही ती कर्जे निरर्थक असणे.**

१५. (१) कर्जदाराने द्यावयाच्या ज्या कर्जाच्या संबंधात कलम ४ अन्वये त्यात निर्दिष्ट केलेल्या मुदतीत, कोणताही अर्ज करण्यात आला नसेल किंवा कलम ८ अन्वये त्यात निर्दिष्ट केलेल्या मुदतीत तडजोडीची नोंद करण्यासाठी कोणताही अर्ज करण्यात आला नसेल किंवा ज्या कर्जाच्या संबंधात न्यायालयाकडे केलेला अर्ज कलम १२ अन्वये मागे घेण्यात आला असून कलम ४ अन्वये कोणताही नवीन अर्ज करण्यात आला नसेल असे प्रत्येक कर्ज आणि अशा कर्जदाराने द्यावयाच्या ज्या कर्जाच्या संबंधात धनकोने कलम १४ च्या तरतुदींनुसार न्यायालयास निवेदन सादर केले नसेल असे प्रत्येक कर्ज लुप्त होईल.

(२) जर कोणत्याही व्यक्तीने आपल्या निवेदनाने, किंवा कोणतेही कृत्य केल्याने अगर करण्याचे वर्जिल्याने आपल्या धनकोची बुध्दिपुरस्सर अशी समजूत केली असेल किंवा होऊ दिली असेल की, ह्या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता आपण कर्जदार नाही किंवा अशा व्यक्तीने अशा धनकोस द्यावयाच्या कोणत्याही कर्जाबाबत कलम ४ अन्वये केलेला कोणताही अर्ज कलम ११ च्या तरतुदींमुळे न्यायालयास स्वीकारता येणार नाही तर अशा व्यक्तीने द्यावयाच्या कोणत्याही कर्जाच्या बाबतीत कलमाच्या कोणत्याही तरतुदी लागू असणार नाहीत.

**कर्जदार व धनको यांची कर्तव्ये.**

१६. (१) ज्या कर्जदाराकडून किंवा ज्या कर्जदाराविरूध्द कलम ४ अन्वये अर्ज करण्यात आला असेल किंवा जो कलम ८ अन्वये केलेल्या अर्जात पक्षकार असेल अशा प्रत्येक कर्जदाराने हिशोबाची सर्व पुस्तके हजर केली पाहिजेत आणि न्यायालयाकडून मागण्यात येतील किंवा विहित करण्यात येतील अशा आपल्या मालमत्तेच्या याद्या व आपल्या धनकोंच्या व कर्जदारांच्या याद्या आणि त्याने देणे असलेल्या व त्यास येणे असलेल्या सर्व कर्जाच्या याद्या दिल्या पाहिजेत ; आणि तसेच त्याने आपल्या मालमत्तेच्या किंवा धनकोंच्या संबंधात अशी तपासणी करू दिली पाहिजे आणि न्यायालयापुढे अशा वेळी हजर असले पाहिजे व सामान्यतः अशा सर्व गोष्टी केल्या पाहिजेत.

(२) प्रत्येक धनकोने, कर्जदाराकडून त्यास येणे असलेल्या कर्जासंबंधी आणि त्याने धारण केलेल्या तारणासंबंधी न्यायालयाकडून मागण्यात येतील किंवा विहित करण्यात येतील अशी हिशोबाची पुस्तके हजर करणे, अशी तपासणी करू देणे आणि अशी माहिती पुरविणे हे त्याचे कर्तव्य असेल.

**प्राथमिक वाद विषय.**

१७. (१) कलम ४ अन्वये केलेल्या अर्जाच्या सुनवणीसाठी ठरविलेल्या दिनांकास, न्यायालयाने प्राथमिक वादविषय म्हणून पुढील मुद्यांचा निर्णय केला पाहिजे :--

(क) ज्या व्यक्तीच्या कर्जाच्या तोडजोडीसाठी अर्ज करण्यात आलेला आहे ती व्यक्ती कर्जदार आहे किंवा कसे ;

(ख) अर्जाच्या दिनांकास अशा व्यक्तीने द्यावयाच्या कर्जाची एकूण रक्कम १५,००० रुपयांपेक्षा अधिक आहे किंवा कसे.

(२) अशी व्यक्ती कर्जदार नाही किंवा अर्जाच्या दिनांकास अशा व्यक्तीने द्यावयाच्या कर्जाची एकूण रक्कम १५,००० रुपयांपेक्षा अधिक आहे असे न्यायालयास आढळून येईल तर, न्यायालयाने असा अर्ज ताबडतोब काढून टाकला पाहिजे :

परंतु, अशा रीतीने अर्ज काढून टाकण्यात येण्यापूर्वी, धनकोंना किंवा त्यांच्यापैकी कोणाही धनकोस, अर्जाच्या दिनांकास अशा व्यक्तीने सर्व धनकोंना द्यावयाच्या कर्जांची एकूण रक्कम रुपये १५,००० रुपयांहून अधिक होणार नाही इतक्या रकमेपर्यंत कमी करण्यासाठी त्यांनी मागणी केलेल्या रकमेचा कोणताही विशिष्ट भाग सोडून देण्याचा अधिकार आहे. अशा बाबतीत न्यायालयाने अर्ज काढून न टाकता अर्जाचे काम पुढे चालू केले पाहिजे.

(३) कर्जाच्या ज्या भागाच्या संबंधात पोट-कलम (२) अन्वये मागणी-हक्क सोडून देण्यात आला असेल तो कर्जाचा भाग लुप्त झाला आहे असे समजण्यात येईल.

[१][**स्पष्टीकरण-**ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता, "अर्जाचा दिनांक" या संज्ञेचा अर्थ, कलम ४ अन्वये विहित केलेल्या मुदतीत करण्यांत आलेल्या अर्जाचा दिनांक आणि जेव्हा एकाच कर्जदाराच्या कर्जांच्या तडजोडीसाठी दोन किंवा अधिक अर्ज करण्यात आले असतील तेव्हा, अशा अर्जांपैकी शेवटच्या अर्जाचा दिनांक असा समजावा.]

**१८.** [न्यायालय शुल्क धनकोस परत करणे.] सन १९४८ चा मुंबई अधिनियम ७० याच्या कलम ६ अन्वये हे कलम निरसित केले.

**१९.** (१) कोणत्याही कर्जाच्या संबंधात कोणत्याही दिवाणी किंवा महसूल न्यायालयात अनिर्णित असलेले सर्व दावे, अपिले, बजावणीचे अर्ज व कामे [२][यात दक्षिणेतील शेतकऱ्यांस सहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९, कलम ५३ अन्वये जिल्हा न्यायाधिशापुढे अनिर्णित असलेल्या फेरतपासणीच्या कामांचा समावेश होतो.] यांत, ज्या व्यक्तीने असे कर्ज देणे आहे ती व्यक्ती कर्जदार आहे किंवा कसे आणि तीने द्यावयाच्या कर्जाची एकूण रक्कम [३][***] १५,००० रुपयांपेक्षा अधिक आहे किंवा कसे असा प्रश्न उद्‌भवल्यास, ती न्यायालयाकडे पाठविण्यात आली पाहिजेत.

(१८७९ चा १७.)

(अनिर्णित दावे, अपिले, अर्ज व कामे न्यायालयाकडे पाठविणे.)

(२) जर एखद्या कर्जाच्या संबंधात [४][पोट-कलम (१) अन्वये न्यायालयाकडे पाठविता येईल] असा दावा, अपील बजावणीचा अर्ज किंवा काम दिवाणी किंवा महसूल न्यायालयापुढे अनिर्णित असेल आणि अशा कर्जाचा समावेश कलम ४ अन्वये कर्जांच्या तडजोडीसाठी न्यायालयाकडे केलेल्या अर्जात किंवा कलम १४ अन्वयें न्यायालयास सादर केलेल्या विवरणपत्रकांत होत असेल तर, न्यायालयाने त्याबद्दलची नोटीस अशा दुसऱ्या न्यायालयास दिली पाहिजे. अशी नोटीस मिळाल्यावर, अशा दुसऱ्या न्यायालयाने, यथास्थिती, असा दावा, अपील, अर्ज किंवा काम न्यायालयाकडे पाठविले पाहिजे.

(३) जेव्हा कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा काम पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये न्यायालयाकडे पाठविण्यात आले असेल तेव्हा, न्यायालयाने जणू कलम ४ अन्वये त्याजकडे अर्ज करण्यात आला आहे असे समजून त्यासंबंधी काम चालविले पाहिजे.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम ५ द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल केले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७(१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[३] वरील अधिनियमाद्वारे हा मजकूर वगळला.

[४] सन १९४८ मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम ७(२) द्वारे हा मजकूर दाखल केला.

(४) ज्या न्यायालयाकडे पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा काम पाठविण्यात आले आहे त्या न्यायालयाने, कलम १७, पोट-कलम (१), खंड (क) मध्ये सांगितेलेल्या प्राथमिक वादविषयावर नकारार्थी निर्णय दिला असेल तर किंवा उक्त पोट-कलम (१) ची खंड (ख) मध्ये सांगितलेल्या प्राथमिक वादविषयावर होकारार्थी निर्णय दिला असेल तर, त्याने असा दावा, अपील, अर्ज किंवा काम ज्या न्यायालयाकडून त्याच्याकडे पाठविण्यात आले होते, त्या न्यायालयाकडे निर्णयानंतर आणि अपील दाखल करण्यात आले असल्यास अशा अपिलांच्या निर्णयास अधीन ठेवून व जेव्हा कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल तेव्हा, अपिलांसाठी विहित केलेली मुदत संपल्यानंतर परत पाठविले पाहिजे.

(५) जेव्हा कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा काम पोट-कलम (४) अन्वये न्यायालयाकडे परत पाठविण्यात आले असेल तेव्हा, उक्त न्यायालयाने त्यासंबंधीचे काम पुढे चालविले पाहिजे.

[1][(६) जेव्हा अशा दाव्यात, अपिलांत, अर्जात किंवा कामात कर्जाच्या तोडजोडीशी ज्याचा बिलकूल संबंध नाही अशा कोणत्याही वादविषयाचा निर्णय करण्याचा प्रश्न उद्‌भवत असेल तेव्हा, असा दावा, अपील, अर्ज किंवा काम ह्या कलमा अन्वये पाठविल्यामुळे न्यायालयास अशा वादविषयाचा निर्णय करण्याचा अधिकार प्राप्त होणार नाही ; आणि असा दावा, अपील, अर्ज किंवा काम, ह्या कलमा अन्वये पाठविण्यात आले नाही असे समजून, उक्त वादविषयाचा निर्णय करण्यांत आला पाहिजे.

(७) ह्या कलमान्वये कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा काम पाठविणे किंवा परत पाठविणे, ह्याच्या वैधतेबद्दल जेव्हा कोणताही प्रश्न उद्‌भवेल किंवा कोणत्याही वादविषयाचा कर्जाच्या तोडजोडीशी बिलकूल संबंध नाही किंवा आहे असा कोणताही वादविषय उद्‌भवेल तेव्हा, ज्या न्यायालयापुढे असा प्रश्न उद्‌भवेल ते न्यायालय किंवा जिल्हा न्यायालय नसल्यास, त्याने तो प्रश्न निर्णयासाठी जिल्हा न्यायालयाकडे पाठविला पाहिजे. जर जिल्हा न्यायालयापुढे असा प्रश्न उद्‌भवेल तर, जिल्हा न्यायालयाने स्वतःच अशा प्रश्नांचा निर्णय केला पाहिजे. या दोहोंपैकी कोणत्याही बाबतीत जिल्हा न्यायालयाचा निर्णय अखेरचा असेल.]

हिशोब घेणे

**२०.** कलम ४ अन्वये ज्याने अर्ज केला असेल किंवा उक्त कलम ४ अन्वये ज्याच्याविरुध्द अर्ज करण्यात आला असेल --

(क) ती व्यक्ती कर्जदार आहे, आणि

(ख) त्या व्यक्तीने अर्जाच्या दिनांकास द्यावयाच्या कर्जाची एकूण रक्कम १५,००० रुपयांपेक्षा अधिक नाही.

असे न्यायालयास आढळून आले तर, न्यायालयाने यांत यापुढे तरतूद केलेल्या रीतीने हिशोब घेण्याच्या कामास लागले पाहिजे.

धनकोची व कर्जदाराची तपासणी.

**२१.** कर्जाच्या तडजोडीसाठी केलेल्या अर्जात जर धनकोने मागणी केलेल्या रकमेविषयी विवाद असेल तर, न्यायालयाने हिशोब घेतांना, धनको व कर्जदार या दोघांची साक्षीदार म्हणून तपासणी केली पाहिजे. परंतु तसे करणे त्यास अनावश्यक वाटल्यास, त्याबद्दलची कारणे त्याने नमूद केली पाहिजेत.

हिशोब घेण्याची रीत.

**२२.** पक्षकारांच्या किंवा ज्या व्यक्तींच्या मार्फत ते मागणीहक्क सांगत असतील त्या व्यक्तींच्या (अशा व्यक्ती कोणत्याही असल्यास) दरम्यान, चक्रवाढ व्याज देण्याविषयी किंवा हिशोब न करता व्याजाऐवजी गहाण मालमत्तेच्या उत्पन्नाची वजावाट देण्याविषयी अगर हिशोब घेण्याची अन्य रीत ठरविण्याविषयी कोणतीही कबुलायत झालेली

[1] सन १९४८ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम ७ (३) द्वारे पोट-कलम (६) व (७) जादा दाखल केले.

असली तरी, आणि कोणतेही हिशोबाचे पत्रक किंवा तडजोड असली तरी, किंवा पूर्वीचे व्यवहार बंद करून नवीन जबाबदाऱ्या निर्माण करण्याचा ज्याचा आशय आहे असा कोणताही करार असला तरी, न्यायालयाने प्रकरणाचा पूर्ववृत्तांत व त्याचे गुणावगुण याबाबत चौकशी केली पाहिजे आणि पक्षकार व ज्या व्यक्तींच्या मार्फत ते मागणी हक्क सांगत असतील ती व्यक्ती (कोणतीही असल्यास) यांच्या दरम्यान चालू असलेल्या ज्या व्यवहारातून मागणीहक्क उपस्थित झाला, ते सुरू झाल्यापासून उभय पक्षकारांचे हिशोब घेतले पाहिजेत आणि कलम ४ अन्वये केलेल्या अर्जाच्या दिनांकास प्रत्येक धनकोस द्यावयाची कर्जाची रक्कम पुढील नियमांस अनुसरून ठरविली पाहिजे. ते नियम असे :--

(१) (क) मुद्दल व व्याज यांचा निरनिराळा हिशोब घेतला पाहिजे.

(ख) हिशोब करताना, कर्जदारास धनकोकडून जो पैसा वेळोवेळी प्रत्यक्षपणे मिळाला असेल किंवा त्याच्या नांवे जमा झाला असेल तो आणि धनकोने त्यास कोणताही माल विकला असल्यास त्याची किंमत, हीच फक्त कर्जदाराच्या नावे मुद्दलाच्या खाती खर्ची घातली पाहिजेत :

(ग) कोणत्याही कर्जाच्या संबंधात सक्षम न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याअन्वये किंवा आदेशाअन्वये मुद्दल (खर्च धरून) व व्याज यांच्या दाखल अनुक्रमे येणे असलेल्या कोणत्याही रकमा असल्यास त्या देखील मुद्दलाच्या खाती व व्याजाच्या खाती खर्ची घातल्या पाहिजेत :

परंतु, जर अशा हुकूमनाम्यात किंवा आदेशांत मुद्दलाची रक्कम व व्याज ही निरनिराळी निर्दिष्ट करण्यात आली नसतील किंवा ती ठरविण्यासाठी कोणतीही माहिती त्यात नसेल तर या खंडाच्या प्रयोजनांकरिता अशा हुकूमनाम्याअन्वये किंवा आदेशाअन्वये देण्यात आलेल्या रकमेच्या दोन तृतीयांश रक्कम व एक तृतीयांश रक्कम ह्या अनुक्रमे मुद्दल (यात खर्चाचा समावेश होतो) व व्याज यांच्या दाखल देण्यात आलेल्या रकमा आहेत असे समजले पाहिजे.

हिशोब घेणे

(२) दिनांक १ माहे जानेवारी सन १९३१ पूर्वी सुरू झालेल्या व्यवहारांच्या बाबतींत न्यायालयाने अर्ज दाखल करण्यात आल्याच्या दिनांकापर्यंत हिशोब घेतला पाहिजे आणि त्या त्या वेळी देणे असलेल्या मुद्दलाच्या राहिलेल्या रकमेवर उभय पक्षांनी कबूल केलेल्या दराने किंवा उभय पक्षांतील दाव्यांत आलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याअन्वये मंजूर केलेल्या दराने किंवा दरसाल दर शेकडा १२ पेक्षा अधिक नसलेल्या दराने यापैकी जी सर्वात कमी असेल त्या दराने-हिशोब करून येणारी सरळ व्याजाची रक्कम कर्जदाराच्या नावे व्याजाच्या खाती खर्ची घातली पाहिजेत. मुद्दल व व्याज यांच्या दाखल जी रक्कम देणे असल्याचे आढळून आले असेल ती प्रत्येकी निरनिराळी शेकडा ४० टक्क्यांने कमी केली पाहिजे, मग अशा कोणत्याही रकमेच्या किंवा तिच्या भागाच्या संबंधी दिवाणी न्यायालयाने हुकूमनामा किंवा आदेश दिलेला असला तरी, तो विचारात घेता कामा नये. अशा रीतीने कमी केलेल्या रकमा ह्या, अर्ज दाखल केल्याच्या दिनांकास व्याज व मुद्दल यांच्या दाखल देणे असलेल्या रकमा आहेत असे समजले पाहिजे.

(३) दिनांक १ माहे जानेवारी सन १९३१ रोजी किंवा तद्नंतर परंतु दिनांक १ माहे जानेवारी सन १९४० पूर्वी सुरू झालेल्या व्यवहारांच्या बाबतीत, त्या त्या वेळी देणे असलेल्या मुद्दलाच्या बाकी रकमेवर उभय पक्षकारांनी कबूल केलेल्या दराने किंवा उभय पक्षांतील दाव्यात झालेल्या कोणत्याही हुकूमनाम्याअन्वये मंजूर दराने किंवा दरसाल शेकडा ९ पेक्षा अधिक नसलेल्या दराने-यापैकी जो सर्वात कमी असेल त्या दराने-हिशोब करून येणारी सरळ व्याजाची रक्कम कर्जदाराच्या नांवे व्याजाच्या खाती खर्ची घातली पाहिजे. अर्ज दाखल केल्याच्या दिनांकास मुद्दल व व्याज या दाखल जी रक्कम देणे असल्याचे आढळून आले असेल ती प्रत्येकी निरनिराळी शेकडा ३० टक्क्यांने कमी केली पाहिजे, मग अशा कोणत्याही रकमेच्या किंवा तिच्या भागाच्या संबंधी

दिवाणी न्यायालयाने कोणताही हुकूमनामा किंवा आदेश दिलेला असला तरी, तो विचारात घेता कामा नये. अशा रीतीने कमी केलेल्या रकमा ह्या, अर्ज दाखल केल्याच्या दिनांकास व्याज व मुद्दल यांच्या दाखल देणे असलेल्या रकमा आहेत असे समजले पाहिजे.

(४) दिनांक १ माहे जानेवारी सन १९४० रोजी किंवा तद्नंतर सुरू झालेल्या व्यवहाराच्या बाबतीत त्या त्या वेळी येणे असलेल्या मुद्दलाच्या बाकी रकमेवर, उभय पक्षांनी कबूल केलेल्या दराने किंवा उभय पक्षांतील दाव्यांत झालेल्या कोणत्याही हुकूमनाम्यांअन्वये मंजूर केलेल्या दराने किंवा दरसाल दर शेकडा ६ पेक्षा अधिक नसलेल्या दरांने--यापैकी जी सर्वात कमी असेल त्या दराने हिशोब करून येणारी सरळ व्याजाची रक्कम कर्जदाराच्या नांवे व्याजाच्या खाती खर्ची घातली पाहिजे.

(५) कर्जदाराने किंवा त्याच्या नावे धनकोस किंवा त्याच्या नावे दिलेला सर्व पैसा आणि व्यवहार चालू असतांना धनकोस मिळालेले सर्व उत्पन्न, चाकरी किंवा कोणत्याही प्रकारचे इतर फायदे (आवश्यक वाटल्यास न्यायालयाने स्वविवेकानुसार यांची पैशाच्या स्वरूपात ठरविलेली किंमत) ही, प्रथम व्याजाच्या खाती जमा केली पाहिजे आणि जर दिलेली कोणतीही रक्कम यथास्थिती नियम (२), (३) किंवा (४) यात निर्दिष्ट केलेल्या दराने देणे असलेल्या व्याजाची बाकी फेडण्यास लागणाऱ्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, अशा रकमेपैकी उरलेली रक्कम ही मुद्दलाच्या खाती कर्जदाराच्या नांवे जमा केली पाहिजे.

(६) मुद्दल व व्याज यांचे हिशोब अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापर्यंत करण्यात आले पाहिजेत, आणि त्या दिनांकास कर्जदाराच्या नावावर असे मुद्दल व व्याज या दोहोंदाखल देणे असल्याचे दिसून येणारी कोणतीही बाकी असल्यास तिची एकूण रक्कम त्या दिनांकास देणे आहे असे समजले पाहिजे. मात्र व्याजादाखल देणे म्हणून असलेली बाकी रक्कम ही मुद्दलदाखल देणे असलेल्या बाकी रकमेपेक्षा अधिक असेल तर, अशा बाबतीत मुद्दलादाखल देणे असलेल्या रकमेच्या दुपटीइतकी रक्कम त्या दिनांकास देणे आहे असे समजले पाहिजे.

परंतु, दिनांक ३० माहे जानेवारी सन १९४० पूर्वी ३० वर्षांपेक्षा आधी उभयपक्षात व्यवहार सुरू झाले असतील तेव्हा, उक्त ३० वर्षांच्या मुदतीपूर्वी उभयपक्षात जी कोणतीही तडजोड घडून आली असेल ती लेखी असून तिच्यावर कर्जदाराची किंवा ज्याच्यामार्फत जबाबदारी प्राप्त झाली असेल त्या व्यक्तीची सही असल्यास ती उभय पक्षकारास बंधनकारक म्हणून मान्य केली पाहिजे आणि अशा तडजोडीच्या दिनांकापूर्वीच्या अशा प्रकरणाच्या पूर्व वृत्तांताची व गुणावगुणाची कोणतीही चौकशी करता कामा नये.

काही बाबतीत उत्पन्नाऐवजी खंड आकारता येईल.

**२३.** जेव्हा कोणतीही गहाण मालमत्ता गहाण घेणाराच्या किंवा गहाण देणाराव्यतिरिक्त त्याच्या इतर कुळांच्या कबजात असेल आणि प्रत्यक्ष उत्पन्न किती मिळाले हे ठरविण्यास न्यायालय असमर्थ असेल तेव्हा, न्यायालयास अशा मालमत्तेच्या बाबतीत वाजवी खंड ठरविण्याचा अधिकार आहे आणि असा खंड, कलम २२ च्या प्रयोजनांकरिता, उत्पन्न म्हणून गहाण घेणाऱ्याच्या नावे दाखल करण्याचा अधिकार आहे :

परंतु, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ कलम ८४अ अन्वये अशा जमिनीच्या खंडाच्या किंवा जमीन महसुलाच्या बाबतीत कोणत्याही वर्षी कोणतीही तहकुबी किंवा सूट मिळाली होती असे दाखवून देण्यात आले तर, त्या वर्षाबद्दल अशी संबंध रककम किंवा तिचा भाग कमी करता येईल. १८७९ चा मुंबई ५.

**२४.** (१) कोणत्याही विधित, रूढीत किंवा करारात तद्विरूध्द काहीही असले तरी, कलम ४ अन्वये केलेल्या अर्जाची सुनावणी चालू असताना, ह्या अधिनियमा अन्वये ज्या व्यक्तीच्या कर्जाची तडजोड चालू असेल त्या व्यक्तीने किंवा ज्या व्यक्तीच्या मार्फत जमीन वारसाहक्काने त्यास मिळाली असेल अशा कोणत्याही व्यक्तीने केलेले जमिनींचे कोणतेही हस्तांतरण हे गहाणाच्या स्वरूपाचे आहे असे म्हणणे असेल तेव्हा, असे हस्तांतरण ज्या परिस्थितीत झाले त्या परिस्थितीवरून असे हस्तांतरण गहाणाच्या स्वरूपाचे आहे असे दिसून येते अशी न्यायालयाची खात्री झाली तर, ते त्या स्वरूपाचे आहे असा न्यायालयाने निर्णय दिला पाहिजे.

विक्रीच्या अर्थाचे हस्तांतरण हे गहाणाच्या स्वरूपाचा व्यवहार आहे असा निर्णय देण्याचा न्यायालयाचा अधिकार.

(२) कोणत्याही शेतमजुरास आपण केलेले जमिनीचे हस्तांतरण किंवा ज्या व्यक्तीमार्फत त्यास जमीन वारसाहक्काने मिळाली असेल अशा कोणत्याही इतर व्यक्तीने केलेले जमिनीचे हस्तांतरण हे गहाणाच्या स्वरूपाचे होते अशा अर्थाचा अर्ज न्यायालयाकडे दिनांक १ माहे ऑगस्ट सन १९४७ पूर्वी करण्याचा अधिकार आहे. अर्जाची सुनावणी केल्यावर न्यायालयाची अशी खात्री झाली की, ज्या परिस्थितीत हस्तांतरण झाले त्या परिस्थितीवरून ते गहाणाच्या स्वरूपाचे आहे असे दिसून येते तर, न्यायालयाचे कोणत्याही विधित रूढीत किंवा करारांत तद्विरुध्द काहीही असले तरी, असे हस्तांतरण गहाण आहे असा निर्णय दिला पाहिजे. जेव्हा न्यायालय असा कोणताही निर्णय देईल तेंव्हा, अर्जदार, हा, कलम २, पोट-कलम (५) यात दिलेल्या 'कर्जदार' संज्ञेच्या व्याख्येत काहीही असले तरी, ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता कर्जदार आहे असे समजले पाहिजे ; आणि जणू कलम ४ अन्वये अर्ज करण्यात आला आहे असे समजून न्यायालयाने त्याप्रमाणे काम चालविले पाहिजे.

**२५.** (१) सक्षम क्षेत्राधिकार असलेल्या न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्याअन्वये किंवा रद्द केलेल्या अधिनियमाचे कलम ४ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मंडळाने जे हस्तांतरण गहाणाव्यतिरिक्त इतर हस्तांतरण आहे असा [१][अंतिम] निर्णय दिला असेल अशा कोणत्याही हस्तांतरणास, आणि

कलम २४ च्या तरतुदी काही हस्तांतरणास व हस्तांतरितीस लागू नसणे.

(२) दिनांक १५ माहे फेब्रुवारी सन १९३९ रोजी किंवा तत्पूर्वी केलेल्या, नोंदलेल्या विलेखाअन्वये जेव्हा खराखुरा हस्तांतरिती किंवा त्याचा प्रतिनिधी जमीन धारण करीत असेल तेव्हा अशा हस्तांतरणाच्या खऱ्या स्वरूपाची नोटीस मिळाली नसता ज्याने किंमत देऊन जमिनीचे हस्तांतरण आपल्याकडे करून घेतले असेल अशा खऱ्याखुऱ्या हस्तांतरितीस किंवा त्याच्या प्रतिनिधीस,

कलम २४ ची कोणताही तरतूद लागू असणार नाही.

**२६.** (१) कर्जाची तडजोड करण्याबद्दल अर्ज आल्यावर, न्यायालयाने, जिल्हाधिकाऱ्यास नोटीस देऊन, कर्जदाराकडून सरकारास येणे असलेली कर्जाची रक्कम किती आहे हे न्यायालयास, ते ठरवील अशा मुदतीत कळविण्याविषयी फर्माविले पाहिजे.

जिल्हाधिकारी, सहकारी संस्था, सहकारी अधिकारी, स्थानिक प्राधिकारी यास व इतरास नोटीस.

(२) तसेच न्यायालयाने, कर्जदाराकडून कोणतेही कर्ज ज्यास येणे असेल अशा कोणत्याही स्थानिक प्राधिकाऱ्यास, सहकारी संस्थेस, [२][अनुसूचित बँकेस किंवा विलीन संस्थानाच्या बँकेस] व त्याचप्रमाणे सक्षम न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्याअन्वये किंवा आदेशाअन्वये कर्जदाराकडून पोटगी मिळण्याचा ज्यास हक्क आहे अशा कोणत्याही व्यक्तीस तशीच नोटीस दिली पाहिजे. सहकारी संस्थेस येणे असलेल्या कोणत्याही कर्जाच्या बाबतीत, न्यायालयाने, सहकारी अधिकाऱ्यास किंवा सहकारी अधिकारी याबाबत नेमील अशा अधिकाऱ्यास देखील नोटीस दिली पाहिजे.

---

[१] सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम ८ द्वारे हा शब्द समाविष्ट केला आहे.

१८७९ चा मुंबई ५.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ४ द्वारे "किंवा अनुसूचित बँकेस" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

(३) अशी नोटीस मिळाल्यावर यथास्थिती, जिल्हाधिकाऱ्याने, स्थानिक प्राधिकाऱ्याने, सहकारी संस्थेने, [१][अनुसूचित बँकेने किंवा विलीन संस्थानाच्या] बँकेने अगर पोटगी मिळण्याचा हक्क असणाऱ्या व्यक्तीने, न्यायालयास ते ठरवील अशा मुदतीत एक विवरणपत्रक वेळोवेळी सादर केले पाहिजे ; अशा विवरणपत्रकात कर्जदाराने द्यावयाच्या कर्जाची एकूण रक्कम व तसेच हुकूमनाम्या अन्वये किंवा आदेशाअन्वये पोटगी देण्याच्या जबाबदारीच्या संबंधात अशा कर्जदारावर असलेली कोणतीही आवर्तक जबाबदारी दर्शविली पाहिजे.

(४) जिल्हाधिकाऱ्याने, [२][सहकारी संस्थेने, अनुसूचित बँकेने व विलीन संस्थानांच्या बँकेने] देखील न्यायालयास एक विवरणपत्रक सादर केलेल पाहिजे. व त्यात, यथास्थिती [३][राज्य] सरकार, सहाकरी संस्था, [४][अनुसूचित बँक किंवा विलीन संस्थानांची बँक] ही कर्जाच्या संबंधात जी सूट देण्यास तयार आहे तिची रक्कम दर्शविली पाहिजे.

(५) पोट-कलम (४) अन्वये कर्जाच्या ज्या भागाची सूट देण्यात आली आहे तो भाग आणि न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नाही तर, पोट-कलम (३) अन्वये ज्याच्या बाबतीत कोणतेही विवरणपत्रक सादर करण्यात आले नाही असे कोणतेही कर्ज किंवा त्याचा भाग लुप्त झाला आहे असे समजले पाहिजे.

मालमत्तेचा तपशील, किंमत वगैरे निश्चित करणे हे न्यायालयाचे कर्तव्य.

**२७.** कलम २२ अन्वये हिशोब घेतल्यावर न्यायालयाने यात यापुढे सांगितलेल्या रीतीने पुढील गोष्टी निश्चित केल्या पाहिजेत :--

(१) कर्जदाराच्या मालकीच्या मालमत्तेचा तपशील,

(२) अशा मालमत्तेची किंमत,

(३) अशा मालमत्तेवर जे कोणतेही भार असतील त्यांचा तपशील, आणि

(४) कर्जदाराचे कर्ज फेडण्याचे सामर्थ्य.

लबाडीने मालमत्ता दुसऱ्याच्या नावे करून देणे किंवा त्यावर भार निर्माण करणे निरर्थक होईल.

**२८.** (१) कलम ४ अन्वये केलेल्या अर्जाची सुनावणी चालू असताना, न्यायालयास असे आढळून आले की, कर्जदाराने आपल्या धनकोचे देणे बुडविण्याच्या हेतूने किंवा ते फेडण्यास विलंब लावण्याच्या हेतूने मालमत्ता दुसऱ्याच्या नावे करून दिली आहे किंवा त्यावर कोणताही भार निर्माण केला आहे तर, न्यायालयाने नोटीस काढून कर्जदारास व ज्याच्या नावे मालमत्ता करून दिली असेल किंवा भार निर्माण केला असेल त्या व्यक्तीस, अशा नोटीशीत निर्दिष्ट केलेल्या दिनांकास आपणापुढे हजर राहण्याविषयी आज्ञा केली पाहिजे.

(२) नोटीशीत निर्दिष्ट केलेल्या दिवशी किंवा अर्जाची सुनावणी पुढे ढकलण्यात येईल त्या दिवशी, न्यायालयाने पक्षकाराचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. [५][व हजर करण्यात येईल तो पुरावा] नमूद केला पाहिजे ; आणि त्यानंतर त्याची अशी खात्री झाली की, कर्जदाराच्या धनकोपैकी कोणत्याही धनकोचे देणे बुडविण्याच्या हेतूने किंवा त्यास विलंब लावण्याच्या हेतूने मालमत्ता दुसऱ्याच्या नावे करून देण्यात आली होती किंवा त्यावर भार निर्माण करण्यात आला होता तर, न्यायालयाने अशा रीतीने मालमत्ता दुसऱ्याच्या नावे करून देणे किंवा त्यावर भार निर्माण करणे हे निरर्थक आहे असा निर्णय दिला पाहिजे.

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम ४ द्वारे "किंवा अनुसूचित बँकेने" हा मजकूराऐवजी दाखल केला.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ४ द्वारे "सहकारी संस्थेने व अनुसूचित बँकेने" या मजकुरांऐवजी हा मजकुर दाखल केला.

[३] विधि अनुकूल आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल केला.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ४ द्वारे "किंवा अनुसूचित बँक" याऐवजी हा मजकूर दाखल केला.

[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम ९ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

(३) ज्या व्यक्तीने सद्भावनापूर्वक व योग्य मोबदला देऊन मालमत्ता आपल्या नावे करून घेतली असेल किंवा आपल्या नावे भार निर्माण करून घेतला असेल अशा व्यक्तीच्या हक्कांस ह्या कलमाच्या कोणत्याही तरतुदींमुळे बाध येणार नाही.

**२९.** (१) कलम २७ अन्वये कर्जदाराचे कर्ज फेडण्याचे सामर्थ्य निश्चित करण्याकरिता कर्जदाराच्या मालमत्तेची व इतर संपत्तीची किंमत न्यायालयाने, पोट-कलम (२), (३) व (४) यांच्या तरतुदींस अधीन राहून, विहित केलेल्या रीतीने ठरविली पाहिजे. कर्जदाराच्या मालमत्तेची किंमत विहित केलेल्या रीतीने न्यायालयाने ठरविणे.

१९०८ चा मुंबई ५. (२) व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये, दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याची बजावणी करताना जी मालमत्ता किंवा संपत्ती जप्तीपासून मुक्त असेल ती हिशोबात घेता कामा नये.

(३) कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कर्जाची रक्कम वजा करण्यात आली पाहिजे.

(४) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधि अन्वये, ज्या जमिनी जिल्हाधिकाऱ्यांच्या किंवा [1][राज्य] सरकारच्या पूर्व मंजुरीवाचून हस्तांतरित करता येत नाहीत किंवा दुसऱ्याच्या नावे करून देता येत नाहीत अशा जमिनींची बाजार किंमत विहित करण्यात येईल अशा रीतीने काढली पाहिजे.

**३०.** ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता कर्जदाराचे कर्ज फेडण्याचे सामर्थ्य हे, कर्जदाराच्या सर्व मालमत्तेच्या किंमतीच्या शेकडा साठ टक्के इतके आहे असे समजले पाहिजे ; कर्ज फेडण्याचे सामर्थ्य.

परंतु, जेव्हाअशा मालमत्तेच्या कोणत्याही भागापासून उत्पन्न मिळत असेल, पण त्याची बाजार-किंमत ठरविता येत नसेल तेव्हा, अशा भागाची किंमत ही, दरसाल दर शेकडा सहा या दराने हिशोब करून उत्पन्नाची जेवढी रक्कम होईल तेवढ्या रकमेइतकी असेल.

**३१.** (१) तद्विरुध्द कोणताही विधि, रूढी, करार, निवाडा किंवा न्यायालयाचा हुकूमनामा अस्तित्वात असला तरी, कलम २२ अन्वये कर्जदाराने देणे असल्याचे आढळून आलेल्या रकमा, यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने क्रमाने आणखी कमी केल्या पाहिजेत. कर्जदाराने द्यावयाची कर्जे क्रमाने कमी करणे.

(२) कलम २२ अन्वये हिशोब घेण्यात आल्यावर कर्जदाराने देणे असल्याचे आढळून आलेल्या सर्व कर्जाबाबत तारण देण्यात आले नसेल तर, अशी कर्जे कर्जदाराच्या कर्ज फेडण्याच्या सामर्थ्यानुसार यथाप्रमाणे क्रमाने आणखी कमी करण्यांत आली पाहिजेत.

(३) कलम २२ अन्वये हिशोब घेण्यात आल्यावर कर्जदाराने देणे असल्याचे आढळून आलेल्या सर्व कर्जाबाबत तारण देण्यात आले असेल आणि अशा कर्जाची एकूण रक्कम ही कर्जदाराच्या मालकीची जी मालमत्ता असेल तिच्या किंमतीच्या शेकडा साठ टक्क्याहून अधिक असेल तर, अशी कर्जे कर्जदाराच्या कर्ज फेडण्याच्या सामर्थ्यानुसार यथाप्रमाण क्रमाने आणखी कमी करण्यात आली पाहिजेत.

(४) कलम २२ अन्वये हिशोब घेण्यात आल्यावर कर्जदाराने देणे असल्याचे आढळून आलेल्या काही कर्जाबाबत तारण देण्यात आले असेल व काही कर्जाबाबत तारण देण्यात आले नसेल, आणि ज्याबाबत तारण देण्यात आले आहे अशा कर्जाची एकूण रक्कम ज्या मालमत्तेचे अशा कर्जाबाबत तारण देण्यात आले असेल त्या मालमत्तेच्या किंमतीच्या शेकडा साठ टक्क्याहून अधिक असेल तर, ज्याबाबत तारण देण्यात आले आहे अशी कर्जे ज्या मालमत्तेचे अशा कर्जबाबत तारण देण्यात आले असेल त्या मालमत्तेच्या किंमतीच्या शेकडा साठ टक्क्यापर्यंत यथाप्रमाण क्रमाने आणखी कमी करण्यात आली पाहिजेत आणि ज्या कर्जाबाबत तारण देण्यात आले नाही अशी कर्जे, कर्जदाराची जी इतर मालमत्ता कर्जाबाबत तारण देण्यात आली नसेल तिच्या किंमतीच्या शेकडा साठ टक्क्यापर्यंत यथाप्रमाण क्रमाने आणखी कमी करण्यात आली पाहिजेत.

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० च्याद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

निवाडा. ३२. (१) कलम ३१ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने क्रमाने कमी केलेल्या कर्जांची रक्कम ठरविल्यानंतर, न्यायालयाने, कलम ३३ मध्ये जी अन्य तरतूद केली असेल ती खेरीज करून, निवाडा केला पाहिजे.

(२) निवाडा विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे असेल व तो तयार करतांना पुढील तरतुदी पाळल्या पाहिजेत.

(१) क्रमाने कमी केलेल्या ज्या कर्जाबाबत तारण देण्यात आले आहे त्या कर्जाचा भार ज्या मालमत्तचे अशा कर्जाबाबत तारण देण्यात आले आहे त्या मालमत्तेवर टाकण्यात आला पाहिजे.

(२) [1][देणे असलेल्या ज्या कर्जाबाबत तारण देण्यात आले नाही त्या कर्जाचा भार कर्जदाराच्या कोणत्याही मालमत्तेवर टाकण्यात येऊ नये असे लेखी निवेदन सर्व धनकोंनी केले नसल्यास,] ज्याबाबत तारण देण्यात आले नाही अशा सर्व कर्जाचा भार, खंड (१) यास अधीन राहून, कर्जदाराच्या सर्व मालमत्तेवर टाकण्यात आला पाहिजे ;

(३) कर्जाची फेड करताना कोणत्या कर्जास अग्रता दिली पाहिजे हे ठरविताना पुढील क्रम अनुसरला पाहिजे-

(क) कर्जदाराच्या मालकीच्या मालमत्तेवर ज्यांचा भार टाकण्यात आला आहे किंवा जी चालू वर्षाच्या जमीन महसुलाप्रमाणे वसूल करता येतील अशी सरकारास देणे असलेली कर्जे,

(ख) कर्जदाराच्या मालकीच्या मालमत्तेवर ज्याचा भार टाकण्यात आला आहे किंवा जी चालू वर्षाची देणी म्हणून वसूल करता येतील अशी स्थानिक प्राधिकाऱ्यांना देणे असलेली कर्जे,

(ग) साधनसंस्थांनी किंवा रद्द केलेल्या अधिनियमाचे कलम ७८ अन्वये किंवा ह्या अधिनियमाचे कलम ५४ अन्वये कर्ज देण्यास अधिकृत केलेल्या व्यक्तींनी दिनांक ३० माहे जानेवारी सन १९४० नंतर रद्द केलेल्या अधिनियमा अन्वये पिकांसाठी पैसा पुरविण्याकरिता किंवा ह्या अधिनियमा अन्वये हंगामी पैसा पुरविण्याकरिता दिलेली कर्जे आणि दिनांक १ माहे जानेवारी सन १९३९ नंतर व दिनांक ३० माहे जानेवारी सन १९४० पूर्वी पिकांसाठी पैसा पुरविण्याकरिता देण्यात आलेली इतर कर्जे,

(घ) ज्यांबाबत तारण देण्यात आले आहे अशी अग्रतेच्या क्रमाप्रमाणे येणारी कर्जे,

(ङ) सरकार, स्थानिक प्राधिकारी व सहकारी संस्था धरून इतर मंडळे यांना देणे असलेली व जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येण्याजोगी कर्जे,

(च) सहकारी संस्थांना देणे असलेली इतर कर्जे,

[2][(चच) विलीन संस्थानाच्या बँकास देणे असलेली कर्जे,]

(छ) ज्याबाबत तारण देण्यात आले नाही अशी कर्जे :

परंतु, ज्याबाबत तारण देण्यात आले नाही अशा कर्जाची फेड यथाप्रमाण करण्यात आली पाहिजे.

(४) एकूण वार्षिक हप्ते १२ पेक्षा अधिक असता कामा नयेत :

परंतु, ज्या हप्त्यांनी कर्जाची फेड केली पाहिजे त्यांची रक्कम ठरवितांना, न्यायालयाने कर्जदारांचे निव्वळ वार्षिक उत्पन्न निश्चित केले पाहिजे आणि कर्जदाराने द्यावयाच्या वार्षिक हप्त्याची रक्कम त्याच्या निव्वळ वार्षिक उत्पन्नांपेक्षा अधिक असता कामा नये.

[1] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ५ द्वारे हा भाग जादा दाखल केला.
[2] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ५ द्वारे उप-खंड (चच) समाविष्ट केले.

**स्पष्टीकरण.**--ह्या खंडाच्या प्रयोजनांकरिता कर्जदाराचे निव्वळ वार्षिक उत्पन्न म्हणजे पुढील रकमा वजा करून बाकी राहिलेले त्याचे वार्षिक उत्पन्न होय. त्या रकमा अशा--

(१) सक्षम न्यायालयाने पोटगीबाबत दिलेल्या हुकूमनाम्या अन्वये किंवा आदेशान्वये कर्जदारावर जी कोणतीही जबाबदारी टाकली असेल ती पुरी करण्याकरिता आवश्यक म्हणून समजण्यात येणारी रक्कम,

(२) कर्जदार व त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांच्या चरितार्थासाठी आवश्यक म्हणून समजण्यात येणारी रक्कम, आणि

(३) चालू वर्षाबद्दल सरकारास व स्थानिक प्राधिकाऱ्यास आकार व कर देण्यासाठी आणि रद्द केलेल्या अधिनियमा अन्वये पिकांसाठी काढलेल्या किंवा ह्या अधिनियमा अन्वये हंगामी खर्च करण्याकरिता काढलेल्या कर्जाची फेड करण्यासाठी कर्जदारास लागणारी रक्कम.

(५) तद्‌विरूध्द कोणताही विधि किंवा करार असला तरी, कोणत्याही मालमत्तेचा कबजा देण्याबाबत आदेश देण्याचा न्यायालयास अधिकार आहे ;

(६) व्याजाचा दर हा, दरसाल दर शेकडा ६ किंवा [1][राज्य] सरकार याबाबत जाहीर करील असा कमी दर किंवा कर्ज प्रथम काढले तेव्हा पक्षकारांनी आपसात कबूल केलेला दर किंवा अशा कर्जाच्या बाबतीत हुकूमनाम्या अन्वये मंजूर केलेला दर, या सर्वात जो कमी असेल त्या दराहून अधिक असता कामा नये.

प्रांतिक जमीन गहाण घेणाऱ्या बँकेमार्फत कर्जाची तडजोड करण्यासाठी न्यायालयाने योजना तयार करणे.

**३३.** (१) कलम ३१ अन्वये कर्जदारांच्या कर्जाची जी रक्कम न्यायालयाने क्रमाने कमी केली असेल ती कर्जदाराच्या स्थावर मालमत्तेची जी किंमत त्याने निश्चित केली असेल तिच्या निम्म्यापेक्षा अधिक असेल तेव्हा, न्यायालयाने कर्जदाराच्या अशा कर्जाची रक्कम व कर्जदाराच्या स्थावर मालमत्तेची अशी किंमत धनकोंना कळविली पाहिजे आणि कर्जदाराच्या स्थावर मालमत्तेच्या अशा किंमतीच्या निम्म्याहून अधिक नाही इतक्या रकमेपर्यंत अशी कर्जे क्रमाने आणखी कमी करण्यास ते कबूल आहेत किंवा नाहीत याविषयी, एक महिन्यापेक्षा अधिक नाही अशा निर्दिष्ट केलेल्या मुदतीत लेखी कळविण्याबद्दल त्यास फर्माविले पाहिजे, जर कर्जाची रक्कम क्रमानें आणखी कमी करण्यास [2][बहुसंख्य व सर्व **सावकारांच्या** कर्जाच्या तीन चतुर्थांशाइतकी ज्यांच्या कर्जाची किंमत होईल] असे सावकार कबूल होतील तर, न्यायालयाने आदेश देऊन अशा रीतीने कबूल करण्यात आलेली कर्जाची रक्कम आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत भरण्याविषयी कर्जदारास फर्माविले पाहिजे.

[3][(२) आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत किंवा न्यायालय परवानगी देईल अशा एक महिन्याहून अधिक नाही इतक्या वाढविलेल्या मुदतीच्या आत कर्जदाराने अशा कर्जाची रक्कम भरून त्याबद्दल धनकोची पावती हजर केली नाही तर, न्यायालयाने कर्जाच्या तडजोडीसाठी एक योजना तयार केली पाहिजे व त्यात ह्या कालमा अन्वये करावयाच्या निवाड्याच्या अटी समाविष्ट केल्या पाहिजे. आणि अशी योजना, स्थानिक क्षेत्रात असलेल्या प्राथमिक जमीन गहाण घेणाऱ्या बँकेकडे आणि त्या स्थानिक क्षेत्रांत अशी प्राथमिक जमीन गहाण घेणारी बँक नसल्यास मुंबई प्रांतिक सहकारी जमीन गहाण घेणाऱ्या बँकेकडे तिला ती मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत स्वीकारण्यासाठी पाठविली पाहिजे. जर यथास्थिती, प्राथमिक जमीन गहाण घेणाऱ्या बँकेने किंवा मुंबई प्रांतिक सहकारी जमीन गहाण घेणाऱ्या बँकेने योजना स्वीकारण्याचे कबूल केले तर किंवा आपण ती योजना स्वीकारण्यास कबूल नाही असे न्यायालयास उक्त दोन महिन्याच्या मुदतीत कळविले नाही तर, न्यायालयाने विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे निवाडा

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल केला.
[2] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम १०(१) द्वारे हा मजकूर दाखल केला.
[3] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

केला पाहिजे. व त्याद्वारे असा निदेश दिला पाहिजे की, संबंधित जमीन गहाण घेणाऱ्या बँकेने अखेरीस क्रमाने कमी करण्यात आलेले कर्ज धनकोंना रोख रकमेत किंवा धनकोची तशी इच्छा असल्यास मुंबई प्रांतिक सहकारी जमीन गहाण घेणाऱ्या बँकेने काढलेल्या कर्जरोख्यांच्या स्वरूपात दिले पाहिजे. अशा कर्जरोख्याबाबत राज्य सरकारने हमी दिलेली असेल व कर्जदाराने धनकोंना द्यावयाच्या सर्व कर्जाची पूर्ण फेड ज्या रकमेने होईल त्या रकमेइतकी त्यांची किंमत असेल. न्यायालयाने आणखी असा निदेश दिला पाहिजे की, अशा रकमेचा भार कर्जदाराच्या सर्व स्थावर मालमत्तेवर राहील.]

[१][(२क) (क) रद्द केलेल्या अधिनियमाचे कलम ५५, पोट-कलम (१) अन्वये किंवा ह्या कलमाचे पोट-कलम (२) अन्वये केलेला कोणताही निवडा हा, मुंबई कर्जदार शेतकरी साहाय्य (सुधारणा) अधिनियम, १९४८ अंमलात येण्यापूर्वी किंवा तद्नंतर अखेरीस क्रमाने कमी केलेल्या कर्जाची रक्कम धनकोंना देण्याकरिता जिला आपल्या उपविधिंअन्वये धनकोस पैसा देण्याचा अधिकार नव्हता अशा कोणत्याही प्राथमिक जमीन गहाण घेणाऱ्या बँकेकडे चुकीने पाठविण्यात आला असेल तेव्हा, ह्या अधिनियमात काही असले तरी, न्यायालयास, संबंधित धनकोने अर्ज केल्यावर व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यावर, असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, असा निवाडा पैसे देण्याचा जिला अधिकार आहे अशा संबंधित स्थानिक क्षेत्रासाठी असलेल्या प्राथमिक जमीन गहाण घेणाऱ्या बँकेकडें किंवा यथास्थिती मुंबई प्रांतीक सहकारी जमीन गहाण घेणाऱ्या बँकेकडे ह्या कलमानुसार पैसे देण्यासाठी पाठविण्यात आला पाहिजे.

सन १९४८ चा मुंबई ७०.

(ख) खंड (क) अन्वये पाठविण्याविषयी ज्याबाबत निदेश देण्यात आला आहे असा निवाडा हा, पैसे देण्याचा अधिकार नसलेल्या प्राथमिक जमीन गहाण घेणाऱ्या बँकेकडे तो प्रारंभतः पाठविण्यात आला होता याच केवळ कारणावरून चुकीने पाठविण्यात आला होता असे समजता कामा नये. आणि ह्या अधिनियमात काहीही असले तरी, तो पोट-कलम (२) अन्वये योग्य रितीने पाठविण्यात आला होता असे समजले पाहिजे आणि त्याची बजावणी ह्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार केली पाहिजे.]

[२][(३) बँकेस कर्जदाराकडून येणे असलेली रक्कम, न्यायालय ठरवील अशा वार्षिक हप्त्यांनी वसूल करण्याचा तिला हक्क असेल. [३][राज्य] सरकार ह्याबाबत राजपत्रात वेळोवेळी जाहीर करील अशा दरसाल [४][दर शेकडा ७ १३/१६] पेक्षा अधिक नसलेल्या दराने मुद्दलावर व्याज घेता येईल आणि असे मुद्दल अशा व्याजासह वसूल करता येईल.]

(४) ह्या कलमा अन्वये बँकेच्या बाजूने दिलेल्या निवाड्याअन्वये देणे असलेल्या सर्व रकमा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येतील ;

[५][परंतु, अशा रकमांच्या वसुलीसाठी जो कोणताही अर्ज करावयाचा तो जिल्हाधिकाऱ्याकडे करण्यात आला पाहिजे व त्यासोबत न्यायालयाने सही केलेले प्रमाणपत्र पाठविण्यात आले पाहिजे.]

क्रमाने कमी केलेल्या कर्जापेक्षा अधिक रक्कम वसूल करता येणार नाही.

**३४.** कलम ३१ अन्वये क्रमाने कमी केलेल्या किंवा कलम ३३ अन्वये क्रमाने आणखी कमी केलेल्या कर्जाची रक्कम ही, ह्या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता अशा कर्जाच्या संबंधात कर्जदाराने देणे असलेली रक्कम असेल ; आणि अशा रकमेपेक्षा अधिक असलेला कर्जाचा भाग लुप्त होईल.

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम १०(२) द्वारे पोट-कलम २(क) समाविष्ट केले.
[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७०, याच्या कलम १० (२) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल केले.
[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल केला.
[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २ द्वारे "दर शेकडा सहा टक्के दराने" याऐवजी हा मजकूर दाखल केला.
[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम ११ (४) द्वारे हे परंतुक जादा दाखल केले.

**संगनमत झाल्याच्या बाबतीत कर्जे क्रमाने कमी न करणे.**

**३५.** कलम ३२ अन्वये निवाडा करताना निवाड्याच्या कामाच्या कोणत्याही पर्यायात न्यायालयाची अशी खात्री होईल की,--

(१) कर्जदाराने एखाद्या धनकोशी संगनमत करून, त्याने अशा धनकोस देणे असलेल्या कर्जाच्या संबंधात कोणत्याही इतर धनकोची वैध देणी बुडविण्याच्या हेतूने चुकीची माहिती पुरविली आहे तर, कलम ३१ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने अशा कर्जदाराची कोणतीही कर्जे क्रमाने कमी करण्याचे नाकारण्याचा न्यायालयास अधिकार आहे ; तसेच त्यास अशा कर्जदाराने द्यावयाच्या कर्जाच्या पूर्ण रकमेबद्दल निवाडा देण्याचा अधिकार आहे.

(२) धनकोने अशा निवाड्याच्या कामात केलेली कोणतीही मागणी ही कर्जदार व असा धनको यांच्यात संगनमत होऊन दुसऱ्या कोणत्याही इतर धनकोची वैध देणी बुडविण्याच्या हेतूने करण्यात आली होती तर, कर्जदाराने अशा धनकोस द्यावयाचे कर्ज लुप्त होईल व ते वसूल करता येणार नाही असा आदेश न्यायालय देईल.

**कोणताही पक्षकार हजर राहिला नाही तर एकपक्षीय काम चालविणे.**

**३६.** (१) ज्या व्यक्तीच्या कर्जाची तडजोड करण्याबाबत कलम ४ अन्वये अर्ज करण्यात आला आहे ती व्यक्ती किंवा तिच्या धनकोपैकी कोणताही धनको अर्जाची सुनावणी करण्यासाठी ठरविलेल्या दिनांकास किंवा ज्या कोणत्याही दिनांकास सुनावणी पुढे ढकलण्यात येईल त्या दिनांकास हजर झाला नाही तरीही, न्यायालयाने अर्जाच्या सुनावणीचे काम एकपक्षीय पुढे चालवून प्राथमिक वादविषयांचा निर्णय केला पाहिजे आणि आवश्यक असल्यास उपलब्ध पुराव्यावरून निवाडा दिला पाहिजे.

(२) जेव्हा कलम ४ अन्वये केलेल्या अर्जाची सुनावणी व निकाल पोट-कलम (१) अन्वये एकपक्षीय होईल तेव्हा, प्राथमिक वादविषयाचा निर्णय किंवा निवाडा यासंबंधी प्रश्न, पुरेशा कारणावाचून, त्यातील कोणताही पक्षकार सुनावणीच्या वेळी हजर नव्हता याच केवळ कारणावरून पुन्हा उपस्थित करता येणार नाही.

**निवाड्याचा प्रश्न पुन्हा उपस्थित करणे व कर्जाची पुन्हा तडजोड करणे.**

**३७.** कलम ३२ अन्वये निवाडा करण्यात आल्यावर, कोणत्याही पक्षकाराने न्यायालयाकडे केलेल्या अर्जावरून किंवा अन्यथा न्यायालयास असे आढळून आले की, कर्जदाराची इतर मालमत्ता आहे परंतु निवाडा दिला तेव्हा तिच्याबद्दल न्यायालयास माहिती देण्यात आली नव्हती किंवा निवाड्यात समाविष्ट केलेली एखादी मालमत्ता कर्जदाराच्या मालकीची नाही तर, ह्या अधिनियमात काहीही असले तरी, न्यायालयास निवाड्याचा प्रश्न पुन्हा उपस्थित करण्याचा आणि ह्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार कर्जाची पुन्हा तडजोड करण्याचा अधिकार आहे :

परंतु, न्यायालयाची अशी खात्री होईल की अशा मालमत्तेची माहिती कर्जदाराने लबाडीने दिली नाही तर, निवाड्याची फेरतपासणी करताना न्यायालय कर्जदारास कलम ३१ चा फायदा देणार नाही.

**निवाड्याची नोंदणी करणे : त्याची बजावणी कशी करावी.**

**३८.** [१][(१) ह्या अधिनियमा अन्वये दिलेला प्रत्येक निवडा हा [२][जर कर्जदाराच्या मालमत्तेवर ज्यांचा भार टाकण्यात आला आहे अशा कर्जाच्या बाबत असेल तर,] कलम ४४ अन्वये द्यावयाचे न्यायालय शुल्क भरण्यात आल्यावर, त्याची नोंदणी विभाग २-अ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने केली पाहिजे.]

(२) निवाड्यासंबंधी द्यावयाचे न्यायालय शुल्क, न्यायालयाने ज्या पक्षकारास खर्च देण्याविषयी आदेश दिला असेल त्याने दिले पाहिजे :

परंतु, खर्च देण्याविषयी ज्यास आदेश देण्यात आला नाही अशा कोणत्याही धनकोस असे न्यायालय शुल्क देता येईल. अशा धनकोस, त्याने स्वत: दिलेली न्यायालय शुल्काची रक्कम, निवाड्या अन्वये त्यास येणे असलेल्या पहिल्या हप्त्याबरोबर अशा कर्जदाराकडून वसूल करण्याचा हक्क असेल :

तसेच कोणतेही न्यायालय शुल्क सहकारी संस्थेस द्यावे लागणार नाही.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७०, याच्या कलम ११ (१) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट कलम दाखल केले.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ७ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

(३) [१][**] निवाड्याची बजावणी पुढीलप्रमाणे करण्यात येईल :--

(१) जर कर्जदाराने निवाड्यान्वये कोणत्याही धनकोस द्यावयाचा कोणताही हप्ता देण्यात कसूर केली तर, अशा धनकोस निवाड्याच्या बजावणीसाठी न्यायालयाकडे विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे अर्ज करण्याचा अधिकार आहे.

(२) असा अर्ज आल्यावर, कर्जदाराने हप्ता भरण्यात कसूर केली आहे अशी न्यायालयाची खात्री झाली तर, न्यायालयाने तो निवाडा बजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविला पाहिजे ; व त्यानंतर जिल्हाधिकाऱ्याने हप्त्याची रक्कम कर्जदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल केली पाहिजे :

परंतु, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये सरकारास, स्थानिक प्राधिकाऱ्यास किंवा सहकारी संस्थेस रक्कम वसूल करण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्याचा जो हक्क असेल त्यास [२][खंड (१) व (२) मधील] कोणत्याही तरतुदीमुळे बाध येणार नाही.

[३][(३) जर न्यायालयाने कलम ३२, पोट-कलम २, खंड (५) अन्वये कोणत्याही मालमत्तेचा कब्जा देण्याविषयी आदेश दिला असेल तर, न्यायालयाने अशा आदेशाची बजावणी, जणू तो त्याने दिलेला हुकूमनामा आहे असे समजून, केली पाहिजे.]

सूट वगैरे यांच्या बाबतीत हप्त्याचा भरणा पुढे ढकलणे.

**३९.** (१) जेव्हा जेव्हा कोणत्याही कारणामुळे [४][राज्य] सरकारास द्यावयाच्या जमीन महसुलापैकी अर्धा किंवा अधिक महसूल भरण्याची तहकुबी किंवा सूट मिळाली असेल तेव्हा-तेव्हा, कलम ८, ९, ३२ किंवा ३३ अन्वये दिलेल्या निवाड्यानुसार त्या वर्षासाठी द्यावयाच्या हप्त्याची सबंध रक्कम किंवा त्यानंतरच्या प्रत्येक वर्षासाठी द्यावयाच्या हप्त्याची सबंध रक्कम यांचा भरणा एकएक वर्षाने पुढे ढकलण्यात येईल.

(२) जेव्हा जेव्हा कोणत्याही कारणामुळे [४][राज्य] सरकारास द्यावयाच्या जमीन महसुलापैकी अर्ध्यापेक्षा कमी भागाचा महसूल भरण्याची तहकुबी किंवा सूट मिळाली असेल तेव्हा-तेव्हा, कलम ८, ९, ३२ किंवा ३३ अन्वये दिलेल्या निवाड्यानुसार त्या वर्षासाठी द्यावयाच्या हप्त्याची अर्धी रक्कम किंवा त्यानंतरच्या प्रत्येक वर्षासाठी द्यावयाच्या हप्त्याची सबंध रक्कम यांचा भरणा एकएक वर्षाने पुढे ढकलण्यात येईल.

कर्जदाराने कर्जफेडीपूर्वी मालमत्ता दुसऱ्याच्या नावे करून देणे हे वैध असणार नाही.

**४०.** कोणत्याही विधि किंवा करार असला तरी, परंतु [५][कलमे ४१ व ५३] यांच्या तरतुदीस अधीन राहून, [६][ह्या अधिनियमा अन्वये चालू असलेल्या कोणत्याही कामात किंवा ह्या अधिनियमा अन्वये नोंदलेल्या कोणत्याही निवाड्यात] पक्षकार असलेल्या कर्जदाराने, त्याच्या मालकीची कोणतीही मालमत्ता त्याच्या सर्व कर्जाची फेड होण्यापूर्वी [७][न्यायालयाच्या] पूर्व मंजुरीवाचून दुसऱ्याच्या नावे करून दिली असल्यास, ती गोष्ट वैध असणार नाही.

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ७ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम ११ (२) द्वारे "या कलमामधील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[३] वरील अधिनियमाद्वारे हा खंड जादा दाखल केला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल केला.

[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७०, याच्या कलम १२ (१) द्वारे "कलम ४१" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[६] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ५ द्वारे "किंवा या अधिनियमा अन्वये दिलेल्या निवाड्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[७] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम १२ (२) द्वारे "प्रांतिक शासनाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

**४१.** न्यायालयाची किंवा निवाड्याविरुध्द केलेल्या अपिलाची सुनावणी ज्या न्यायालयाने केली असेल त्या न्यायालयाची कोणत्याही वेळी अशी खात्री झाली असेल की, कर्जदाराच्या कर्जाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या फेडीसाठी त्याच्या मालमत्तेचा कोणताही भाग विकणे हे त्याच्या हिताचे आहे तर, अशा न्यायालयास मालमत्तेचा असा भाग अशा कारणासाठी निर्दिष्ट केलेल्या मुदतीत विकण्याची कर्जदारास परवानगी देण्याचा अधिकार आहे. जर कर्जदाराने मालमत्तेच्या भागाची अशी विक्री केली नाही तर, अशा न्यायालयास तो भाग विकण्याबद्दल न्यायालयाच्या अधिकाऱ्यास आदेश देता येईल. ह्या कलमाअन्वये जी मालमत्ता विकण्याविषयी आदेश दिला असेल ती, अशा अधिकाऱ्याने विहित केलेल्या रीतीने विकली पाहिजे ; कर्जदाराच्या कर्जफेडीसाडी त्याच्या मालमत्तेची विक्री करण्याविषयी आदेश देण्याचा न्यायालयाचा अधिकार.

परंतु, मालमत्तेचा जो भाग विकण्याविषयी ह्या कलमा अन्वये आदेश देण्यात आला असेल तो, कलम ४७, पोट-कलम (२) अन्वये जो भाग विकता येईल त्यापेक्षा अधिक असता कामा नये.

**४२.** [१][कलमे २४ व २८ आणि कलम ३८, पोट-कलम (३)] याअन्वये जी कामे चालू असतील त्याव्यतिरिक्त ह्या अधिनियमा अन्वये न्यायालयापुढे किंवा अपील न्यायालयापुढे चालू असलेल्या कोणत्याही इतर कामात कोणत्याही पक्षकारातर्फे हजर राहण्याचा कोणत्याही वकिलास हक्क असणार नाही : वकील वगैरे यास हजर राहण्यास प्रतिबंध.

[२][परंतु, न्यायालयास किंवा अपील न्यायालयास, न्यायदानाच्या दृष्टीने, लेखी नमूद करावयाच्या कारणासाठी, पक्षकारांना स्वतःच्या खर्चाने वकिलामार्फत आपली बाजू मांडण्याची परवानगी देण्याचा अधिकार आहे :]

तसेच ह्या अधिनियमा अन्वये चालू असलेल्या कोणत्याही कामात वकिलाने हजर राहण्याबद्दल त्यास द्यावयाची फी ही खर्चाचा भाग म्हणून मंजूर करता कामा नये :

[३][आणखी तसेच, विधिविहित असमर्थता असलेल्या किंवा व्यवस्था पाहण्यास किंवा काम करण्यास अक्षम किंवा असमर्थ असलेल्या व्यक्तिच्या मालमत्तेचा संरक्षक, वहिवाटदार किंवा व्यवस्थापक म्हणून कोणताही सरकारी अधिकारी सक्षम न्यायालयाकडून नेमण्यात किंवा जाहीर करण्यात आला असेल किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधि अन्वये अधिकृत करण्यात आला असेल तर, अशा अधिकाऱ्यास न्यायालयापुढे अगर अपील न्यायालयापुढे चालू असलेल्या कोणत्याही कामात, त्याने याबाबत ज्यास लेखी अधिकार दिला असेल अशा प्रतिनिधीमार्फत हजर राहण्याचा हक्क असेल. अशा प्रतिनिधीस अशा कोणत्याही कामात उक्त अधिकाऱ्याच्यावतीने कोणताही अर्ज सादर करण्याचा किंवा अन्यथा कोणतेही काम करण्याचा अधिकार आहे.]

**४३.** कोणत्याही इतर विधित [४][**] काहीही असले तरी-- अपिले.

(१) पुढील आदेशांवर व निवाड्यावर अपील करता येईल :--

(१) कलम ८, पोट-कलम (३) अन्वये दिलेला प्रत्येक आदेश ;

(२) कलम १७ अन्वये दिलेला प्रत्येक आदेश ;

(३) कलम २४ अन्वये दिलेला प्रत्येक आदेश ;

(४) कलम २८ अन्वये दिलेला प्रत्येक आदेश ;

(५) कलम ३६, पोट-कलम (२) अन्वये दिलेला प्रत्येक आदेश ;

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २ द्वारे "कलमे २४ व २८" याऐवजी हा मजकूर दाखल केला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम १३ (१) द्वारे मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल केले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३ (२) द्वारे हे परंतुक जादा दाखल केले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १४ (१) द्वारे हा मजकूर वगळला.

(६) कलम ८, पोट-कलम (४) किंवा कलम ९ याअन्वये केलेल्या तडजोडीबरहुकूम केलेला निवाडा किंवा जो करण्यापूर्वी कलम ३३, पोट-कलम (१) अन्वये धनकोची कबुली मिळवण्यात आली होती असा, कलम ३३ अन्वये केलेला निवाडा किंवा जो करण्यापूर्वी न्यायालयास कर्जदाराने द्यावयाची कर्जाची रक्कम निश्चित करता यावी म्हणून कर्जदाराने किंवा कोणत्याही धनकोने पुरावा हजर केला नाही असा निवाडा याखेरीज ह्या अधिनियमाअन्वये केलेला प्रत्येक निवाडा ;

[१][(७) [२][कलम ४७, पोट-कलम (१) किंवा (१-क) याअन्वये कर्जदारास नादार ठरविण्याबाबत] दिलेला आदेश ; परंतु नादार व्यक्तीने आपले देयादेय याविषयी महत्त्वाच्या गोष्टी प्रकट करण्यात कसूर केली या मुद्याव्यतिरिक्त इतर मुद्यांवर अशा आदेशाविरुध्द अपील करता येणार नाही ;]

[३](२) न्यायालयाच्या निर्णयावर जिल्हा न्यायालयाकडे अपील करता येईल आणि असे अपील, यथास्थिती मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य (सुधारणा) अधिनियम, १९४८ अंमलात आल्याच्या दिनांकापासून किंवा आदेशाच्या किंवा निवाड्याच्या दिनांकापासून, यापैकी जी अधिक उशिरांची असेल त्या दिनांकापासून ; साठ दिवसाच्या आत केले पाहिजे. अशी साठ दिवसांची मुदत मोजताना भारतीय मुदत अधिनियम, १९०८, कलम ४, ५ व १२ यांच्या तरतुदी, शक्य तेथवर, लागू होतील.] (सन १९४८ चा मुंबई ७०.) (१९०८ चा ९.)

(३) ह्या अधिनियमा अन्वये न्यायालयाने दिलेला कोणताही निर्णय, आदेश किंवा निवाडा याविरुध्द दुसरे अपील करता येणार नाही.

अपिलांची सुनावणी करण्याचा अधिकार असलेल्या सहाय्यक न्यायाधिशाकडे किंवा दिवाणी न्यायाधिशाकडे काही अपिले निर्णयासाठी पाठविण्याचा जिल्हा न्यायाधिशाचा अधिकार.

[४][**४३-क.** निकटपूर्वीच्या कलमान्वये दाखल केलेले कोणतेही अपील, मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९, कलम २७ अन्वये अपिलांची सुनावणी करण्याचा अधिकार असलेल्या सहाय्यक न्यायाधिशाकडे किंवा दिवाणी न्यायाधिशाकडे निर्णयासाठी पाठविण्याचा जिल्हा न्यायाधिशास अधिकार आहे.] (१८६९ चा १४.)

न्यायालय शुल्क.

**४४.** (१) न्यायालय शुल्क अधिनियम, १८७० यात काहीही असले तरी, या अधिनियमा अन्वये चालविलेल्या कामाच्या संबंधात द्यावयाचे न्यायालय शुल्क पुढील दरांनी दिले पाहिजे :-- (१८७० चा ७.)

(१) कलम ४ चे किंवा कलम ८ चे पोट-कलम (१) याअन्वये केलेल्या अर्जावर किंवा कलम ८, पोट-कलम (४) किंवा कलम ९ अन्वये दिलेल्या निवाड्यावर--रु. १ ;

(२) खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निवाड्याव्यतिरिक्त इतर निवाड्यावर--निवाड्याच्या रकमेच्या प्रत्येक शंभर रुपयास किंवा त्याच्या भागास रु. १--अशी फी जास्तीत जास्त रु. ५० इतकी असेल ;

(३) कलम ८, पोट-कलम (३) किंवा कलम १७, पोट-कलम (२) याअन्वये न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द केलेल्या अपिलावर--रु. २ ;

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७०, याच्या कलम १४ (२) द्वारे हे उप-खंड जादा दाखल केले.

[२] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २ द्वारे "कलम ४७ अन्वये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम १४ (३) द्वारे हा खंड दाखल केला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे हे कलम समाविष्ट केले.

(४) खंड (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अपिलाव्यतिरिक्त इतर अपिलावर--[1][जी रक्कम अपिलात अंतर्भूत असेल] तिच्या प्रत्येक शंभर रुपयांस किंवा त्याच्या भागास रु. १--अशी फी जास्तीत जास्त रु. ५० इतकी असेल.

(२) कोणत्याही विधित काहीही असले तरी, या अधिनियमा अन्वये चालविलेल्या कामाच्या संबंधात द्यावयाचे न्यायालय शुल्क हे, ज्या पक्षकारास खर्च देण्याविषयी आदेश देण्यात आला असेल त्याच्या मालमत्तेवर प्रथम भार म्हणून राहील. आणि ते विहित करण्यात येईल अशा रीतीने वसूल करता येईल.

१९०८ चा ५. **४५.** या अधिनियमा अन्वयें जी कोणतीही नोटीस बजावणे भाग आहे ती, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ यात तरतूद केलेल्या रीतीने बजावण्यांत आली पाहिजे; आणि त्याबाबत नियम करण्यात येतील तेव्हा, ती अशा नियमांनी विहित करण्यात येईल त्या रीतीने बजावण्यात आली पाहिजे. नोटीशीची बजावणी कशी करावी.

१९०८ चा ५. **४६.** या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या तरतुदी ह्या विभागा अन्वये चालविलेल्या सर्व कामास लागू होतील : दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुदी चालविलेल्या कामास लागू असणे.

[2][परंतु, न्यायालयास, योग्य त्या बाबतीत व त्यास योग्य वाटतील अशा अटींवर त्याच्यापुढे कलम ४ किंवा २४ अन्वये चालू असलेल्या कोणत्याही कामात, उक्त संहितेचा आदेश १, नियम १० याअन्वये पक्षकार दाखल करण्याचा किंवा काढून टाकण्याचा त्यास असलेला अधिकार चालविता येईल. मग यथास्थिती कलम २४ यात निर्दिष्ट केलेला दिनांक निघून गेल्यानंतर अशा रीतीने पक्षकार दाखल करावयाचे किंवा काढून टाकावयाचे असले तरी असा अधिकार चालविण्यास हरकत येणार नाही.]

## [3][प्रकरण २-क]

## निवाड्यांची नोंदणी

**४६-क.** नोंदणी विभागाच्या सर्व कचेऱ्यात ' कर्ज तडजोड निवाड्यांची नोंदवही ' या नांवाचे एक पुस्तक व त्यासंबंधीचे सूचिपत्र ठेवण्यात आले पाहिजे. असे पुस्तक व सूचिपत्र ही, [4][राज्य] सरकार विहित करील अशा नमुन्याप्रमाणे ठेवली पाहिजेत व त्यात ते विहित करील असा तपशील असला पाहिजे. कर्ज तडजोड नोंदवही व सूचिपत्र.

[5]**[४६-ख.** [5][जेव्हा कलम ३८ अन्वये निवाड्याची नोंदणी करणे भाग असेल तेव्हा, निवाड्यातील विषयभूत मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग ज्या उपजिल्ह्यांत असेल त्याच्या उप-निबंधकाकडे आणि त्या क्षेत्रासाठी कोणताही उप-निबंधक नसेल तर, अशी मालमत्ता किंवा तिचा भाग ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याच्या उप-निबंधकाकडे निवाडयाची एक प्रमाणित प्रत आणि [4][राज्य] सरकार विहित करील असा तपशील असलेलें एक ज्ञापन ही, अशा निवाड्यावरील न्यायालय शुल्क कलम ४४ च्या तरतुदींनुसार भरण्यात आल्यावर पाठविणे हे असा निवाडा देणाऱ्या न्यायालयाचे कर्तव्य असेल.] न्यायालयाने निवाडे व ज्ञापने निबंधक व उप-निबंधक यांच्याकडे पाठविणे.

[6]**[४६-ग.** एखाद्या पक्षकाराने कलम ४३ अन्वये दिलेल्या निवाड्याविरूद्ध अपील केले तर आणि जर कलम ३८ अन्वये अशा निवाड्याची नोंदणी झाली असेल तर, कलम ४६-ब अन्वये निवाड्याची प्रमाणित प्रत ज्यास पाठविण्यांत आली होती त्या उप-निबंधकाकडे किंवा निबंधकाकडे अपील दाखल केल्याबद्दलची नोटीस पाठविणे हें ज्या न्यायालयांत असे अपील दाखल करण्यात आले होते त्या न्यायालयाचे कर्तव्य असेल.] निबंधकांना अपिलांची नोटीस देणे.

**४६-घ.** निवाड्याविरूद्ध अपील करण्यासाठी ठरविलेली मुदत संपल्यानंतर कोणतेही अपील दाखल करण्यात आले नाही तर, किंवा अपील दाखल करण्यात आले तर ते निकालात काढल्यानंतर, यथास्थिती उप-निबंधक किंवा निबंधक याने कर्ज तडजोड निवाडयांच्या नोंदवहीत निवाड्याची नोंदणी केली पाहिजे. व तसेच कलम ४६-अ अन्वये ठेवलेल्या सूचिपत्रात तपशिलाची नोंद केली पाहिजे. नोंदणी.

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७०, याच्या कलम १६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[2] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ९ द्वारे हे परंतुक जादा दाखल केले.

[3] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम १७ द्वारे प्रकरण २-अ समाविष्ट केले.

[4] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल केला.

[5] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल केले.

रद्द केलेल्या अधिनियमाअन्वये केलेल्या निवाड्यांची नोंदणी.

**४६-ड.** रद्द केलेल्या अधिनियमा अन्वये केलेले सर्व निवाडे-मग ते उक्त अधिनियमाच्या तरतुदी अन्वये दिनांक २७ माहे मे सन १९४७ पूर्वी नोंदलेले असोत वा नसोत-यांची नोंदणी ह्या विभागा अन्वये केली पाहिजे :

परंतु कलम ४४ मध्ये काहीही असले तरी, अशा निवाड्यावर उक्त कलमा अन्वये आणखी कोणतेही न्यायालय शुल्क द्यावे लागणार नाही.

निवाड्याची नोटीस.

**४६-च.** ज्या कर्जदाराच्या कर्जाच्या तडजोडीबाबत निवाडा करण्यात आला आहे [१][व तो नोंदण्यात आला आहे] अशा कर्जदाराची कोणतीही मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग ज्याने संपादन केला आहे किंवा अशा मालमत्तेचा कोणताही हिस्सा किंवा तिच्यातील हितसंबंध ज्याने संपादन केला आहे अशा व्यक्तीस निवाड्याची नोटीस, ती ह्या विभागा अन्वये नोंदण्यात आल्याच्या दिनांकापासून मिळाली आहे असे समजण्यात आले पाहिजे.

भारतीय नोंदणी अधिनियम लागू असणे.

**४६-छ.** यात जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारासह, निवाड्यांच्या नोंदणीस लागू होतील ; आणि ह्या विभागात वापरण्यात आलेले परंतु ह्या अधिनियमात व्याख्या न केलेले शब्दप्रयोग यांचा भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ यात त्या शब्दांचा व शब्दप्रयोगांचा जो अर्थ दिलेला असेल तोच असेल. १९०८ चा १६.

## प्रकरण ३.

## नादारीबाबत चालविलेली कामे

न्यायालयाने विवक्षित परिस्थितीत कर्जदारास नादार ठरविणे.

**४७.** (१) विभाग २ अन्वये चालविलेल्या कामाच्या कोणत्याही पर्यायात जर न्यायालयास असे आढळून येईल की, कर्जदाराचे उत्पन्न व त्याची जंगम मालमत्ता ही त्याच्या कर्जाची फेड बारापेक्षा अधिक नाही इतक्या वार्षिक हप्त्यांनी होण्यास पुरेशी नाहीत तर, न्यायालयाने आदेश देऊन अशा कर्जदारास नादार ठरविले पाहिजे.

[२][(१-क) निवाड्याच्या दिनांकापासून दोन वर्षांची मुदत संपल्यानंतर जर कर्जदार न्यायालयाची अशी खात्री करून देईल की, निवाड्या अन्वये ठरविलेल्या हप्त्यांची बाकीची रक्कम भरणे योग्य विचार करता आपणास शक्य होणार नाही तर, न्यायालयास, ह्यां अधिनियमात काहीही असले तरी, धनकोस नोटीस दिल्यानंतर, निवाड्याच्या अटीत फेरफार करण्याचा व त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे हप्त्याची रक्कम कमी करण्याचा अधिकार आहे अथवा न्यायालयास, आदेश देऊन अशा कर्जदारास नादार ठरविण्याचा अधिकार आहे. परंतु, ज्यावेळी हप्त्याची रक्कम कमी करण्यात येईल तेव्हा कर्जाच्या बाकीच्या रकमेची फेड ज्या वार्षिक हप्त्यांनी करावयाची ते एकूण हप्ते वीसापेक्षा अधिक असता कामा नयेत.]

(२) कर्जदारास नादार ठरविल्यानंतर, न्यायालयाने असा निदेश दिला पाहिजे की, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, कलम ६० अन्वये कर्जदाराच्या मालमत्तेचा जप्तीस व विक्रीस पात्र असलेला जो भाग कर्जदाराच्या सर्व कर्जांची फेड करण्यासाठी आवश्यक असेल तो अशा कर्जदाराने द्यावयाच्या सर्व कर्जाच्या फेडीसाठी सर्व भारापासून मुक्त असा ताबडतोब विकण्यात यावा. मात्र, अशा कर्जदाराच्या व त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींच्या चरितार्थासाठी कमीत कमी आवश्यक म्हणून अशा मिळकतीचा जो भाग [३][राज्य] सरकार राजपत्रात वेळोवेळी जाहीर करील तो विक्री करावयाच्या मालमत्तेतून न्यायालयाने असा निदेश देताना वगळला पाहिजे. १९०८ चा ५.

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १२ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

[२] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३ द्वारे हे पोट-कलम समाविष्ट केले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल केला.

४८. [1][कलम ४७, पोट-कलम (१) किंवा (१) अ अन्वये] दिलेला नादारीबाबतचा आदेश हा सक्षम न्यायालयाने प्रांतिक नादारी अधिनियम, १९२०, कलम २७ अन्वये त्यास असलेले अधिकार बजावताना दिलेल्या आदेशाप्रमाणे अंमलात येईल. नादारी संबंधी चालविलेल्या कामात अनुसरावयाची कार्यरीती.

४९. कलम ४७ अन्वये नादार व्यक्तीची मालमत्ता विकून जी किंमत येईल तिच्या रकमेची वाटणी, कलम ३२, पोट-कलम (२) खंड (३) यात निर्दिष्ट केलेल्या अग्रतेच्या क्रमानुसार केली पाहिजे. नादार व्यक्तीच्या संपत्तीची वाटणी.

५०. कर्जदाराच्या नादारीसंबंधी कोणताही अर्ज किंवा काम इतर कोणत्याही न्यायालयात करता किंवा चालविता येणार नाही किंवा अशा कोणत्याही न्यायालयास त्याची विल्हेवाट लावता येणार नाही. इतर न्यायालयात नादारीबाबत अर्ज करण्यास प्रतिबंध.

१९०८ चा १६. [2][५१. कलम ४३, खंड (१), उपखंड (७) अन्वये जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, ह्या विभागा अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशावर कोणतेही अपील करता येणार नाही.] अपिलास प्रतिबंध.

## प्रकरण ४
## संकीर्ण

[3][५१-क. ह्या अधिनियमा अन्वये अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीज करून आणि कोणत्याही इतर विधित काहीही असले तरी, कोणत्याही दिवाणी न्यायालयाने पुढील गोष्टींसंबंधी कोणताही दावा किंवा कारवाई दाखल करून घेता किंवा चालविता कामा नये ; त्या गोष्टी अशा :-- दिवाणी दावे किंवा कारवाई यास प्रतिबंध.

(१) ह्या अधिनियमा अन्वये न्यायालयापुढे अनिर्णित असलेली कोणतीही बाब, अथवा

(२) रद्द केलेल्या अधिनियमा अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मंडळाने किंवा न्यायालयाने अनुसरलेल्या कोणत्याही कार्यरीतीची वैधता किंवा त्याने दिलेल्या कोणत्याही निवाड्याची, आदेशाची किंवा निर्णयाची वैधता, अथवा

(३) अशा निवाड्या अन्वये द्यावयाच्या कोणत्याही कर्जाची वसुली.]

५२. जी व्यक्ती कर्जदार नसल्याविषयी न्यायालयाने किंवा अपील न्यायालयाने निर्णय दिला आहे अशा कोणत्याही व्यक्तीने द्यावयाच्या कर्जासंबंधी [4][किंवा ज्या कर्जाबाबत करण्यात आलेला अर्ज न्यायालयाने किंवा अपील न्यायालयाने काढून टाकला आहे अशा कर्जासंबंधी कोणताही दावा किंवा कारवाई दाखल करण्यासाठी ठरविलेली मुदत मोजताना, अशा कर्जासंबंधीचे काम न्यायालयापुढे किंवा अपील न्यायालयापुढे ज्या मुदतीत चालू होते ती मुदत वगळण्यात आली पाहिजे.] ज्या मुदतीत ह्या अधिनियमा अन्वये न्यायालयापुढे काम चालू असेल ती मुदत वगळणे.

५३. (१) जो ह्या अधिनियमा अन्वये चालविलेल्या कोणत्याही कामात किंवा निवाड्यात पक्षकार आहे [5][किंवा होता] आणि जो साधनसंस्थेने किंवा रद्द केलेल्या अधिनियमाचे कलम ७८ अन्वये किंवा ह्या अधिनियमाचे कलम ५४ अन्वये कर्जे देण्यास अधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने रद्द केलेल्या अधिनियमा अन्वये पिकांसाठी पैसा पुरविण्याकरिता किंवा ह्या अधिनियमा अन्वये हंगामी पैसा पुरविण्याकरिता कर्ज दिल्यामुळे अशा संस्थेचा किंवा व्यक्तीचा कर्जदार आहे अशा व्यक्तीने अशा कर्जाची पूर्ण फेड होईपर्यंत यथास्थिति, अशा संस्थेच्या किंवा व्यक्तीच्या आगाऊ परवानगीवाचून आपल्या जमिनीवरील उभ्या पिकांचे किंवा तिच्यातील उत्पन्नांचे तारण गहाण लावून देता कामा नये किंवा ती विकता कामा नये. कर्जाची फेड करण्यापूर्वी उभी पिके वगैरे दुसऱ्याच्या नावे करून देण्यास मनाई. (१९०८ चा ५.)

---

[1] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१, याच्या कलम ४ द्वारे "कलम ४७ अन्वये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[2] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम १८ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल केले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे हे कलम दाखल केले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम २१ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

(२) जी कोणताही व्यक्ती पोट-कलम (१) चे उल्लंघन करून आपल्या जमिनीवरील उभ्या पिकांचे किंवा तिच्यातील उत्पनांचे तारण गहाण लावून देईल किंवा ती विकील तो, दोषी ठरविण्यात आला असता, सहा महिने पर्यंतच्या मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल किंवा पराकाष्ठा ५०० रुपये पर्यंतच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(३) ज्या न्यायालयापुढे काम चालविण्यात आले असेल किंवा ज्या न्यायालयाने निवाडा दिला असेल त्या न्यायालयाने लेखी तक्रार केलेली असल्यावाचून कोणत्याही फौजदारी न्यायालयाने ह्या कलमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेता कामा नये.

कर्जदारास कर्जे देण्याविषयी कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

**५४.** (१) [1][राज्य] सरकारास [2][किंवा त्याने अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास,] राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात, कोणत्याही व्यक्तीस, ह्या अधिनियमा अन्वये चालू असलेल्या कोणत्याही कामात जे पक्षकर असतील किंवा ह्या अधिनियमा अन्वये ज्यांच्या कर्जाबाबत तडजोड करण्यात आली असेल अशा कर्जदारांना कर्जे देण्याविषयी प्राधिकृत करण्याचा अधिकार आहे.

(२) असा अधिकार विहित करण्यात येतील अशा शर्तीवर देण्यात आला पाहिजे.

नियम.

**५५.** (१) [1][राज्य] सरकारास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, ह्या अधिनियमाचे उद्देश अंमलात आणण्याकरिता वेळोवेळी नियम करण्याचा अधिकार आहे ; मात्र असे नियम करण्यापूर्वी ते आगाऊ प्रसिध्द करण्यात आले पाहिजेत.

(२) विशेषकरून व वरील तरतुदींच्या सामान्यतेस बाध येऊ न देता असे नियम पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही गोष्टीबाबत करण्याचा अधिकार आहे--

क) कलम २, खंड (१३) अन्वये ज्या कारणाकरिता कर्जे देता येतील ती कारणे ;

ख) कलम ४, पोट-कलम (२) अन्वये करावयाच्या अर्जाचा नमुना आणि ज्या रीतीने त्यावर सही केली पाहिजे व त्याच्या खरेपणाबद्दल प्रामाण्यलेख करून दिला पाहिजे व तो सादर केला पाहिजे ती रीत ;

ग) कलम ८, पोट-कलम (२) अन्वये करावयाच्या अर्जाचा नमुना व ज्या रीतीने त्याच्यावर सही केली पाहिजे व त्याच्या खरेपणाबद्दल प्रामाण्यलेख करून दिला पाहिजे ती रीत आणि पोट-कलम (३) अन्वये ज्या रीतीने नोटीस दिली पाहिजे ती रीत ;

घ) कलम १४ अन्वये ज्या रीतीने नोटीस दिली पाहिजे व ज्या रीतीने सर्वसाधारण नोटीस प्रसिध्द केली पाहिजे ती रीत आणि ज्या नमुन्याप्रमाणे विवरणपत्रक सादर केले पाहिजे तो नमुना ;

ड.) कलम १६, पोट-कलम (१) अन्वये विहित करावयाच्या मालमत्तेच्या याद्या, धनकोच्या व कर्जदारांच्या याद्या व कर्जदाराने देणे असलेल्या व त्यास येणे असलेल्या कर्जाच्या याद्या, मालमत्तेच्या व धनकोच्या संबंधीची तपासणी, कर्जदाराने ज्या वेळी न्यायालयापुढे हजर राहिले पाहिजे व मालमत्तेसंबंधी इतर गोष्टी केल्या पाहिजेत; आणि कलम १६, पोट-कलम (२) अन्वये धनकोने कर्जदाराकडून त्यास येणे असलेल्या कर्जासंबंधी हिशोबाची जी पुस्तके हजर केली पाहिजेत ती पुस्तके, जी तपासणी करू दिली पाहिजे ती तपासणी व जी माहिती दिली पाहिजे ती माहिती ;

च) कलम २९, पोट-कलम (१) अन्वये मालमत्तेची व इतर संपत्तीची किंमत ज्या रीतीने ठरविली पाहिजे ती रीत आणि पोट-कलम (४) अन्वये जमिनींची बाजार-किंमत ज्या रीतीने काढण्यात आली पाहिजे ती रीत ;

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल केला.

[2] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम २२ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

छ) कलम ३२, पोट-कलम (२) व कलम ३३, पोट-कलम (२) अन्वये ज्या नमुन्याप्रमाणे निवाडा केला पाहिजे तो नमुना ;

ज) कलम ३८, पोट-कलम (३) खंड (१) अन्वये करावयाचा अर्जाचा नमुना ;

झ) कलम ४१ अन्वये ज्या रीतीने मालमत्तेची विक्री करता येईल ती रीत ;

ञ) कलम ४४, पोट-कलम (२) अन्वये न्यायालय शुल्क वसूल करण्याची रीत ;

ट) कलम ४५ अन्वये, ज्या रीतीने नोटीशीची बजावणी केली पाहिजे ती रीत ;

[1][(टक) कलम ४६-क अन्वये ठेवलेल्या कर्ज तडजोड निवाड्यांच्या नोंदवहीचा व सूचिपत्राचा नमुना व त्यात दाखल करावयाचा तपशील ;

टख) कलम ४६-ब अन्वये ज्ञापनांत दाखल करावयाचा तपशील ;]

ठ) कलम ५४, पोट-कलम (२) अन्वये कर्जे देण्याविषयी अधिकार ज्या शर्तीवर देण्यात आला पाहिजे त्या शर्ती.

१८७९ चा १७. १९३९ चा मुंबई २८. **५६.** (१) [2][दक्षिणेतील शेतकऱ्यास साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९ हा, मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९३९ याअन्वये रद्द करण्यात आला असला तरी, प्रथमनिर्दिष्ट अधिनियम हा, प्रस्तुत अधिनियम ज्या व्यवहारांना व कामांना लागू नाही अशा व्यवहारांना व कामांना जेथवर लागू असेल तेथवर, प्रस्तुत अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून (जिचा उल्लेख ह्या कलमात ह्यापुढे उक्त दिनांक म्हणून केला आहे) पुन्हा अधिनियमित करण्यात आला आहे असे समजले पाहिजे आणि तो उक्त दिनांकापासून तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील : सन १८७९ चा अधिनियम १७ व सन १९३९ चा मुंबई अधिनियम २८ हे रद्द करणे.

१८७९ चा १७. परंतु, उक्त तीन वर्षांची मुदत संपण्यापूर्वी दाखल केलेल्या कोणत्याही दाव्यांतील किंवा दाव्यांतून उद्‌भवणारे कोणतेही काम हे, उक्त मुदत संपल्यानंतरही, जणू दक्षिणेतील शेतकऱ्यास सहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९ उक्त मुदत संपल्यानंतर अंमलात असण्याचे चालू होते असे समजून चालू ठेवून निकालात काढले पाहिजे :]

[3][तसेच,] जे कर्जदार असतील व ज्यांच्या कर्जांबाबत ह्या अधिनियमाचे कलम ४ अन्वये अर्ज करता येईल, अशा व्यक्तींच्या बाबतीत, उक्त दिनांकास कोणत्याही न्यायालयापुढे कोणतेही काम चालू असतांना केलेल्या कोणत्याही गोष्टीस ह्या पोट-कलमांतील कोणत्याही तरतुदींमुळे बाध येते असे समजता कामा नये आणि असे कोणतेही काम चालू ठेवल्यास ते ह्या अधिनियमाच्या तरतुदींशी जेथवर विसंगत नसेल तेथवर, चालू ठेवता येईल :

आणखी तसेच, ज्या कोणत्याही दाव्यांत किंवा कामात असा कर्जदार पक्षकार होता असा कोणताही दावा किंवा काम ह्या अधिनियमाचे कलम १९ अन्वये न्यायालयाकडे पाठविण्यास ह्या पोट-कलमातील कोणत्याही तरतुदींमुळे कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही.

१९३९ चा मुंबई २८. (२) मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९३९ हा रद्द करण्यात आला आहे. रद्द केलेल्या अधिनियमाचे कलम ४ अन्वये स्थापन करण्यात आलेली सर्व मंडळे विघटित होतील :

[4][परंतु,--

(क) हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकास कोणत्याही अशा मंडळापुढे अनिर्णित असलेली सर्व कामे ही, ह्या अधिनियमा अन्वये न्यायालयाने जणू त्याबाबत कलम ४ अन्वये न्यायालयाकडे अर्ज करण्यात आला होता असे समजून पुढे चाले ठेवून निकालात काढली पाहिजेत.

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७०, याच्या कलम २३ द्वारे खंड (टक) व (टख) समाविष्ट केले.

[2] वरील अधिनियमाच्या क्रमांक २४ (१) (अ) द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २४ (१) (ब) द्वारे "परंतु" याऐवजी हा मजकूर दाखल केला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २४ (२) द्वारे हे परंतुक दाखल केले.

(ख) रद्द केलेल्या अधिनियमा अन्वये दिलेले, कायम केलेले किंवा फेरफार करण्यात आलेले सर्व निवाडे हे, जणू हा अधिनियम, उक्त निवाडे ज्या दिनांकास यथास्थिती देण्यात किंवा कायम करण्यात आले होते किंवा त्यांत फेरफार करण्यात आला होता त्या दिनांकास अंमलात होता असे समजून, ह्या अधिनियमा अन्वये देण्यात किंवा कायम करण्यात आले आहेत किंवा त्यात फेरफार करण्यात आला आहे असे समजले पाहिजे.

(ग) अशा मंडळाचा निर्णय, आदेश किंवा निवाडा ह्याविरुध्द रद्द केलेल्या अधिनियमां अन्वये केलेली व कोणत्याही न्यायालयापुढे अनिर्णित असलेली सर्व अपिले ही, जणू ती प्रस्तुत अधिनियमाच्या तरतुदींनुसार दाखल करण्यात आली होती असे समजून पुढे चालू ठेवून निकालात काढली पाहिजेत ; आणि

(घ) अशा मंडळाचा कोणताही निर्णय, आदेश किंवा निवाडा ह्याविरुध्द जी अपिले रद्द केलेल्या अधिनियमां अन्वये दाखल करता आली असती परंतु जी उक्त अधिनियम प्रस्तुत अधिनियमांमुळे रद्द करण्यात आला याच केवळ कारणावरून दाखल करता आली नाहीत अशी सर्व अपिले सक्षम न्यायालयापुढे दाखल केली असता, ह्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार दाखल करण्यात आली आहेत असे समजले पाहिजे व त्याप्रमाणे ती निकालात काढली पाहिजेत.]

[३][विलीन प्रदेशांतील व धनकोस देणे असलेल्या कर्जाच्या संबंधात कलम ४ अन्वये अर्ज करण्याबाबत विशेष तरतूद ]

[१][**५७** (१) विलीन प्रदेशास लागू असलेला मुंबई विलीन संस्थाने (विधि) अधिनियम, १९५० याच्या तरतुदींअन्वये सुधारणा करण्यात आलेले प्रस्तुत अधिनियमांचे कलम ४ यात काहिही असले तरी,-- (१९५० चा मुंबई ४.)

(क) जर कोणत्याही कर्जदारास विलीन प्रदेशातील धनकोला, असा प्रदेश ज्या दिनांकास [२][राज्यांत] विलीन झाला त्या दिनांकास कर्ज देणे असेल आणि जर असा कर्जदार उक्त दिनांकास ज्या जागेत सामान्यतः राहात होता ती जागा अशा प्रदेशाबाहेर असेल तर, अशा कर्जदारास, अथवा

(ख) त्याच्या धनकोस,

मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य (सुधारणा) अधिनियम, १९५० अंमलात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत कलम ४ अन्वये न्यायालयाकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे. (१९५०चा मुंबई ३७.)

(२) उक्त मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य (सुधारणा) अधिनियम, १९५० अंमलांत आल्याच्या दिनांकापूर्वी ज्या कोणत्याही कर्जदारास किंवा धनकोस ह्या अधिनियमांचे कलम ४ अन्वये अर्ज करता आला असता त्यास पोट-कलम (१) मधील कोणत्याही तरतुदींनुसार अर्ज करण्याचा हक्क प्राप्त होणार नाही ;

परंतु, जर कर्जदाराची अशा प्रदेशात, तो प्रदेश मुंबई [२][राज्यांत] ज्या दिनांकास विलीन झाला त्या दिनांकास काणतीही मालमत्ता होती आणि उक्त दिनांकाच्या निकटपूर्वी अशा अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये अशा कर्जदाराकडून येणे असलेल्या कर्जाची रक्कम उपाययोजना करून अशा मालमत्तेतून वसूल करता आली असती तर, अशा कर्जदारास किंवा त्याच्या धनकोस पोट-कलम (१) अन्वये अर्ज करण्याचा हक्क असेल. (१९५० चा मुंबई ३७.)

विलीन प्रदेशात असलेल्या जमिनीच्या बाबतीत कलम २४ अन्वये अर्ज करण्याबाबत विशेष तरतूद]

**५८.** विलीन प्रदेशांना लागू असलेल्या मुंबई विलीन संस्थाने (विधि) अधिनियम, १९५० याअन्वये सुधारणा करण्यात आलेले प्रस्तुत अधिनियमांचे कलम २४ यांत काहीही असले तरी, ज्या शेतमजुरांस कोणत्याही विलीन प्रदेशात असलेल्या कोणत्याही जमिनीचे झालेले हस्तांतरण हे वस्तुतः गहाण आहे असा निर्णय मिळण्यासाठी कलम २४ अन्वये अर्ज करण्याचा हक्क आहे. त्यास उक्त कलमां अन्वये अर्ज करण्याचा अधिकार आहे. असा अर्ज, मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य (सुधारणा) अधिनियम, १९५०, अंमलात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आंत, अशी जमीन ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्रात ज्या दिवाणी न्यायाधिशांस (वरीष्ठ स्तर) सामान्य क्षेत्राधिकार असेल त्याच्या न्यायालयाकडे आणि असा दिवाणी न्यायाधिश नसेल तर, अशा क्षेत्रात ज्या दिवाणी न्यायाधिशांस (कनिष्ठ स्तर) क्षेत्राधिकार असेल त्याच्या न्यायालयाकडे केला पाहिजे.] (१९५० चा मुंबई ६.) (१९५० चा मुंबई ३७.)

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७, याच्या कलम १३ द्वारे कलम ५७ व ५८ जादा दाखल केले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल केला.

[३] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ३ व दुसरी अनुसूची याद्वारे मूळ समासटीपेऐवजी ही समासटीप दाखल केली.

एच ७५-६,०८२ पु.-१-२००७

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.